# महाराष्ट्र राज्यात राज्य शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे तपशील



**महाराष्ट्र राज्यात राज्य शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे संकलन / तपशील**

*********************************************************************

| अ.क्र. | योजनेचे नांव | विवरण / योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| **१.** | **शासकीय संस्था आणि अशासकीय संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या विशेष शाळांद्वारे विशेष शिक्षण.** | **संदर्भ - विशेष शाळा आणि कार्यशाळेसाठी शाळा संहिता – १९८५ (सध्याची लागू – महाराष्ट्र दिव्यांग विशेष शाळा व कार्यशाळा संहिता, २०१८)**<br><br>**अर्थ सहाय्य :** विनाअनुदानित संस्था वगळता राज्य सरकार.<br><br>**योजनेचा उद्देश :** दिव्यांग मुलांच्या शिक्षणास प्रोत्साहित करणे.<br><br>**पात्रतेचे निकष :**<br>१. दिव्यांग विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेणे आवश्यक.<br>२. किमान ४०% दिव्यांगत्व असणे आवश्यक आहे.<br>३. महाराष्ट्राचा राज्याचा रहिवासी असला पाहिजे.<br>४. उत्पन्नाची मर्यादा नाही.<br><br>**लाभाचे स्वरूप :**<br>१. दिव्यांगत्वाच्या श्रेणीनुसार प्रवेश, सुगम्य स्वरूपात विनामूल्य विशेष शिक्षण.<br>२. निवासी विद्यार्थ्यांच्या बाबतीत मोफत निवास आणि बोर्डिंग.<br>३. योग्य स्वरूपात मोफत अभ्यास साहित्य.<br>४. मोफत गणवेश.<br>५. प्रशिक्षित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी.<br>६. अपंगत्वाच्या प्रकारानुसार मोफत वैद्यकीय उपचार आणि उपचार.<br>७. दिव्यांग, कर्णबधिर आणि लोकोमोटर दिव्यांगत्व या वर्गवारीसाठी अनुदानित विशेष शाळांमधील परिपोषणपोटी संस्थेला दरमहा रू. २२००/- रुपये दिले जातात. |

| | | |
|---|---|---|
| | | ८. बौद्धिक दिव्यांगत्वासाठी अनुदानित विशेष शाळांमधील परिपोषणपोटी संस्थेला दरमहा प्रति विद्यार्थी रू. २४५०/- रुपये दिले जातात.<br><br>**योजनेचा प्रकार :** दिव्यांगांचे विशेष शिक्षण<br><br>**संपर्क कार्यालय** :<br>जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, मुंबई शहरी व मुंबई उपनगर.<br><br>**लाभार्थी :**<br>दिव्यांग व्यक्तीं हक्क अधिनियम, २०१६ नुसार २१ दिव्यांग प्रकारातील ६ ते १८ वयोगटातील विद्यार्थी.<br><br>**अर्ज कसा करावा :**<br>संबंधित शाळा व्यवस्थापनाकडे आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा. |
| २. | **शासकीय संस्था आणि अशासकीय संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या विशेष कार्यशाळांद्वारे विशेष प्रशिक्षण.** | **संदर्भ - विशेष शाळा आणि कार्यशाळेसाठी शाळा संहिता – १९८५ (सध्याची लागू – महाराष्ट्र दिव्यांग विशेष शाळा व कार्यशाळा संहिता, २०१८)**<br><br>**अर्थ सहाय्य :** विनाअनुदानित संस्था वगळता राज्य सरकार.<br><br>**योजनेचा उद्देश :** दिव्यांग मुलांच्या विशेष प्रशिक्षणास प्रोत्साहित करणे.<br><br>**पात्रतेचे निकष :**<br>१. किमान ४०% दिव्यांगत्व असणे आवश्यक आहे.<br>२. महाराष्ट्राचा राज्याचा रहिवासी असला पाहिजे.<br>३. उत्पन्नाची मर्यादा नाही. |

४. वयाच्या १८ व्या वर्षावरील सर्व दिव्यांग.

**लाभाचे स्वरूप :**

१. दिव्यांगत्वाच्या श्रेणीनुसार प्रवेश, सुगम्य स्वरूपात विनामूल्य विशेष शिक्षण.
२. निवासी विद्यार्थ्यांच्या बाबतीत मोफत निवास आणि बोर्डिंग.
३. योग्य स्वरूपात मोफत प्रशिक्षण साहित्य.
४. मोफत गणवेश.
५. प्रशिक्षित निदेशक आणि निदेशकेतर कर्मचारी.
६. दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार मोफत वैद्यकीय उपचार आणि उपचार.
७. दिव्यांग, कर्णबधिर आणि लोकोमोटर दिव्यांगत्व या प्रकारासाठी अनुदानित विशेष कार्यशाळांमधील परिपोषणपोटी संस्थेला प्रतिप्रशिक्षणार्थी दरमहा रू. २२००/- रुपये दिले जातात.
८. बौद्धिक दिव्यांगत्वासाठी अनुदानित विशेष शाळांमधील परिपोषणपोटी संस्थेला दरमहा प्रतिप्रशिक्षणार्थी रू. २४५०/- रुपये दिले जातात.

**योजनेचा प्रकार :** दिव्यांगांचे विशेष प्रशिक्षण

**संपर्क कार्यालय :**

जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, मुंबई शहर व मुंबई उपनगर.

**लाभार्थी :**

दिव्यांग व्यक्तीं हक्क अधिनियम, २०१६ नुसार 21 दिव्यांग प्रकारातील ६ ते १८ वयोगटातील विद्यार्थी.

**अर्ज कसा करावा :**

| | | |
|---|---|---|
| | | संबंधित शाळा व्यवस्थापनाकडे आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा. |
| **३.** | **शालांत परीक्षा पुर्व (प्री-मॅट्रिक) शिष्यवृत्ती** | **संदर्भ :** शासन निर्णय इडीडी-२००३/प्र.क्र.७०/सुधार २,दिनांक-१५.११.२००३.<br>**अर्थ सहाय्य :** राज्य सरकार.<br>**योजनेचा उद्देश :**<br>शिष्यवृत्तीच्या माध्यमातून दिव्यांग मुलांच्या शालेय विशेष शिक्षणास प्रोत्साहीत करणे.<br><br>**पात्रतेचे निकष :**<br>१. दिव्यांग विद्यार्थ्यांनी प्रथम इयत्तेपासून ते दहावीपर्यंत शिक्षण घेणे आवश्यक आणि मागील शैक्षणिक वर्षात ते अनुत्तीर्ण होता कामा नये.<br>२. किमान ४०% दिव्यांगत्व असणे आवश्यक आहे.<br>३. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असला पाहिजे.<br>४. उत्पन्नाची मर्यादा नाही.<br><br>**लाभाचे स्वरूप :**<br>१. इयत्ता पहिली ते चौथी (कर्णबधीर असणाऱ्यांसाठी पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी) प्रत्येक विद्यार्थ्याकरता दरमहा रु.१००/-<br>२. इयत्ता पाचवी ते सातवी प्रत्येक विद्यार्थ्याकरता दरमहा रु.१५०/-<br>३. इयत्ता आठवी ते दहावी प्रत्येक विद्यार्थ्याकरता दरमहा रु.२००/-<br>४. १८ वर्षे वयापर्यन्तच्या, मानसिक दुर्बलता आणि मानसिक आजाराने ग्रासलेल्या व्यक्ती प्रत्येक विद्यार्थ्याकरता दरमहा रु.१५०/-<br>५. कार्यशाळेतील दिव्यांग प्रशिक्षणार्थी प्रत्येक विद्यार्थ्याकरता दरमहा रु.३००/-<br>**योजनेचा प्रकार :** दिव्यांगांचे विशेष शिक्षण |

<table>
<tr><td></td><td></td><td>संपर्क कार्यालय :<br>जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, मुंबई शहर व मुंबई उपनगर.<br>लाभार्थी :<br>दिव्यांग व्यक्तीं हक्क अधिनियम, २०१६ नुसार २१ दिव्यांग प्रकारातील ६ ते १८ वयोगटातील विद्यार्थी.<br>अर्ज कसा करावा :<br>अर्जदाराने विहित नमून्यामध्ये अर्ज भरुन आवश्यक कागदपत्रासहित संबंधित शाळेमार्फत अर्ज दाखल करावा.</td></tr>
<tr><td>३.</td><td>शालांत परीक्षोत्तर पुर्व (पोस्ट-मॅट्रिक) शिष्यवृत्ती</td><td>संदर्भ : शासन निर्णय इडीडी-२००३/प्र.क्र.७१/सुधार २,दिनांक-१५.११.२००३.<br>अर्थ सहाय्य : राज्य सरकार.<br>योजनेचा उद्देश :<br>शिष्यवृत्तीच्या माध्यमातून दिव्यांग मुलांच्या विशेष उच्च शिक्षणास प्रोत्साहीत करणे.<br><br>पात्रतेचे निकष :<br>१. इयत्ता दहावी नंतर उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, पदवी, व्यावसायिक, तांत्रिक, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शिक्षण घेणे<br>२. शिक्षणाच्या मागील वर्षात अनुत्तीर्ण राहिलेले नसावेत<br>३. विद्यार्थी किमान ४०% दिव्यांग असला पाहिजे<br>४. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असला पाहिजे.<br>५. उत्पन्नाची मर्यादा नाही.<br><br>लाभाचे स्वरूप:<br><table><tr><td colspan="4">अ. निर्वाह भत्ता</td></tr><tr><td>अ. क्र.</td><td>गट</td><td>दरमहा शिष्यवृत्तीचा दर रु.</td><td>दरमहा शिष्यवृत्तीचा दर रु.</td></tr></table></td></tr>
</table>

| — | — | वसतिगृहातीलविद्यार्थी | अनिवासी विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | गट अ- वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय पदवी अभ्यासक्रम आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम | १२००/- | ५५०/- |
| २ | गट ब- वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय पदविका अभ्यासक्रम | ८२०/- | ५३०/- |
| ३ | गट क- कला, विज्ञान, वाणिज्य पदव्युत्तर अभ्यासक्रम आणि व्यावसायिक शिक्षण पदविका | ८२०/- | ५३०/- |
| ४ | गट ड- पदवी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षापासून | ५७०/- | ३००/- |
| ५ | गट इ- अकरावी, दहावी आणि पदवी अभ्यासक्रमाचे पहिले वर्ष | ३८०/- | २३०/- |

**ब. अंध आणि कमी दृष्टी असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पाठक भत्ता.**

**गट अ, ब, क :** दरमहा रु.१००/-

**गट ड :** दरमहा रु.७५/-

**गट इ :** दरमहा रु.५०/-

**क. शिक्षण शुल्क** — सक्षम प्राधिकाऱ्याने संमती दिल्याप्रमाणे.

**ड. शैक्षणिक दौऱ्याचा खर्च** — दर वर्षी रु.५००/- पर्यन्त.

**इ. प्रकल्प टंकलेखनाचा खर्च** — दर वर्षी रु.६००/- पर्यन्त.

**योजनेचा प्रकार :** दिव्यांगांचे विशेष उच्च शिक्षण

**संपर्क कार्यालय :**

| | | |
|---|---|---|
| | | जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, मुंबई शहर व मुंबई उपनगर.<br>**लाभार्थी :**<br>दिव्यांग व्यक्तीं हक्क अधिनियम, २०१६ नुसार २१ दिव्यांग प्रकारातील ६ ते १८ वयोगटातील विद्यार्थी.<br>**अर्ज कसा करावा :**<br>अर्जदाराने विहित नमून्यामध्ये अर्ज भरुन आवश्यक कागदपत्रांसहित संबंधित महाविद्यालयामार्फत अर्ज दाखल करावा. |
| ४. | **गुणवत्ता पुरस्कार** | **संदर्भ :** शासन निर्णय इडीडी-१०९१/२७४४/के. क्र.८३/सुधार-२ दि.- २१.१०.१९९१.<br><br>**अर्थ सहाय्य :** राज्य सरकार.<br>**योजनेचा उद्देश :**<br>माध्यमिक शालांत परीक्षा आणि उच्च माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये राज्यात पहिला, दूसरा आणि तिसरा क्रमांक मिळवण्याऱ्या प्रथम तीन दिव्यांग विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करणे.<br><br>**पात्रतेचे निकष :**माध्यमिक शालांत परीक्षा आणि उच्च माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये राज्यात पहिला, दूसरा आणि तिसरा क्रमांक मिळवणारे प्रथम तीन दिव्यांग विद्यार्थी.<br>**योजनेचा प्रकार:** शिक्षण.<br>**संपर्क कार्यालय** - संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग.<br>**लाभार्थी :**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ दिव्यांग प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती.<br><br>**लाभाचे स्वरूप:** बक्षीसाचे स्वरूप रु.१,०००/- रोख आणि प्रमाणपत्र असे आहे. बक्षीस घेण्यासाठी किंवा सत्कार समारंभाला |

| | | |
|---|---|---|
| | | उपस्थित राहण्यासाठी होणाऱ्या प्रवासखर्चासाठी, प्रत्येक विद्यार्थ्याकरता रु.१००/- पर्यन्त खर्चाची प्रतिपूर्ती केली जाईल.<br><br>**अर्ज कसा करावा :**अर्जदाराने विहित नमून्यामध्ये अर्ज भरुन आवश्यक कागदपत्रासहित अर्ज दाखल करावा. |
| ६. | **दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारा - साठी आर्थिक सहाय्य** | **संदर्भ :** शासन निर्णय इडीडी-१०८७/२८८६३/(१५८)/ सुधार-२ दि.- ०५.०१.१९८९.<br>**अर्थ सहाय्य :** राज्य सरकार.<br>**योजनेचा उद्देश :** या योजनेचा मुख्य उद्देश सध्या बेरोजगार असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता आर्थिक सहाय्य देणे. या योजनेअंतर्गत, दिव्यांग व्यक्तींना, स्वयंरोजगार, लघु उद्योग आणि/किंवा कृषि आधारित व्यवसाय करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.<br><br>**पात्रतेचे निकष :**<br>१. अर्जदार किमान ४०% दिव्यांग असला पाहिजे.<br>२. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असला पाहिजे.<br>३. अर्जदाराचे १८ ते ५० वर्षांमध्ये असावे<br>४. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पेक्षा कमी असावे.<br>**योजनेचा प्रकार:** स्वयंरोजगार<br>**संपर्क कार्यालय:** जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर<br>**लाभार्थी :**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ दिव्यांग प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती.<br>**लाभाचे स्वरूप :** या योजनेअंतर्गत, रु.१,५०,०००/- यामधील आर्थिक सहाय्य दिले जाते. ८०% कर्जाची रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेकडून पुरवली जाते आणि २०% किंवा रु.३०,०००/- पर्यन्तचे |

| | | |
|---|---|---|
| | | अनुदान, समाज कल्याण विभागातर्फे स्वयंरोजगारासाठी दिले जाते.<br>**अर्ज कसा करावा:** वर नमूद केल्याप्रमाणे. |
| ७. | **प्रशिक्षित दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारा-साठी आर्थिक सहाय्य** | **संदर्भ :** शासन निर्णय आस्था-११८५/प्र.क्र.६२४/(८)/ सुधार-२ दि.- २०.१०.१९८७.<br>**अर्थ सहाय्य :** राज्य सरकार.<br>**योजनेचा उद्देश :** स्वतःचा व्यवसाय चालू करण्यासाठी, शासकीय संस्थांमध्ये किंवा एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेमध्ये, व्यावसायिक प्रशिक्षण घेत असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना, उपकरणांच्या खरेदीच्या सुलभीकरणासाठी आर्थिक सहाय्य करणे.<br>**पात्रतेचे निकष :**<br>१. अर्जदाराने शासकीय संस्था किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थेमध्ये व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.<br>२. अर्जदार किमान 40% दिव्यांग असावा<br>३. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा<br>**योजनेचा प्रकार:** स्वयंरोजगार<br>**संपर्क कार्यालय:** जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर<br>**लाभार्थी :**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ दिव्यांग प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती.<br>**लाभाचे स्वरूप :** राज्य शासनातर्फे स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारी पूर्ण उपकरणे / संच विकत घेण्यासाठी रु.१,०००/- ची आर्थिक मदत केली जाते.<br><br>**अर्ज कसा करावा:** वर नमूद केल्याप्रमाणे. |
| ८. | **दिव्यांग व्यक्तींसाठी साधने आणि** | **संदर्भ :** शासन निर्णय इडीडी-१०८८/१२१८५/के.क्र.८२/ सुधार-२ दि.- १०.०८.१९८९. |

| | | |
|---|---|---|
| | **उपकरणांसाठी आर्थिक सहाय्य** | **अर्थ सहाय्य :** राज्य सरकार.<br>**योजनेचा उद्देश :** दिव्यांग व्यक्तींना, त्यांचा वयोगट आणि दिव्यांगत्वाप्रमाणे, साधने आणि उपकरणे खरेदी करण्यासाठी सहाय्य<br>**पात्रतेचे निकष :**<br>१. अर्जदार किमान ४०% दिव्यांगत्व असले पाहिजे.<br>२. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे.<br>३. अर्जदाराचे मासिक उत्पन्न खालीलप्रमाणे असल्यास –<br>अ) रु.१,५००/- पेक्षा कमी : साधने आणि उपकरणांच्या किमतीच्या १००%.<br>आ) रु.१,५००/-ते २,०००/- : साधने आणि उपकरणांच्या किमतीच्या ५०%.<br>**योजनेचा प्रकार:** विशेष सहाय्य.<br><br>**संपर्क कार्यालय:** जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर<br>**लाभार्थी** :दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ दिव्यांग प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती.<br>**लाभाचे स्वरूप :** कर्णबधीर व्यक्तींसाठी श्रवणयंत्र, अस्थिव्यंग व्यक्तींसाठी कुबड्या, तिनचाकी, कॅलिपर्स , चाकाची खुर्ची, अंध व्यक्तींसाठी शैक्षणिक वापराकर्ता फीत ध्वनिमुद्रक आणि कोरी ध्वनीफीत (रु. ३,०००/- पर्यन्त).<br><br>**अर्ज कसा करावा:** अर्जदाराने विहित नमून्यातील अर्ज भरुन संबंधित जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व मुंबई उपनगर यांच्याकडे दाखल करणे. विहित नमुन्यामध्ये, आवश्यक कागदपत्रासहित, अर्ज दाखल करावा. |

| | | |
|---|---|---|
| ९. | **विवाह विषयक प्रोत्साहन योजना** | **संदर्भ :** शासन निर्णय अपंग-२०१३/प्र.क्र.१०३/अ.क्र.२ दि.- १७.०६.२०१४.<br>**अर्थ सहाय्य :** राज्य सरकार.<br>**योजनेचा उद्देश :** एक दिव्यांग व्यक्ती, किमान ४०% अपंगत्व असलेली, दिव्यांग नसलेल्या व्यक्तीशी विवाह करत असेल, अशी दिव्यांग व्यक्ती विवाहविषयक प्रोत्साहनास पात्र असेल.<br><br>**पात्रतेचे निकष :**<br>१. विवाह करण्याऱ्या दोघांपैकी किमान एक – पत्नी किंवा पति दिव्यांग असावी.<br>२. अर्जदार किमान ४०% दिव्यांग असावा.<br>३. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.<br>**योजनेचा प्रकार:** सामाजिक प्रोत्साहन.<br><br>**संपर्क कार्यालय:** जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर.<br><br>**लाभार्थी** :दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ दिव्यांग प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती.<br><br>**लाभाचे स्वरूप :**<br>पात्र जोडप्याला रु.५०,०००/- आर्थिक सहाय्य मिळेल. त्याचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.<br>१. रु. २५,०००/- चे बचत प्रमाणपत्र.<br>२. रु. २०,०००/- रोख रक्कम.<br>३. रु. ४,५००/- गृहोपयोगी वस्तूंच्या स्वरूपात.<br>४. रु. ५००/- विवाहविषयक प्रोत्साहनाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी.<br>**अर्ज कसा करावा:** अर्जदाराने विहित नमुन्यात अर्ज भरून संबंधित जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद |

| | | |
|---|---|---|
| | | /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर यांच्याकडे दाखल करणे. विहित नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रासहित अर्ज दाखल करावा. |
| १०. | **दिव्यांगांसाठी राज्य पुरस्कार योजना** | **संदर्भ :** शासन निर्णय इडीडी-२२८०/१०४१३/डीएक्स, दि.-०९.०२.१९८२.<br>**अर्थ सहाय्य :** राज्य सरकार.<br>**योजनेचा उद्देश :** दर वर्षी राज्य शासनाकडून, सर्वोत्कृष्ठ दिव्यांग कर्मचारी / नियोक्ता / रोजगार सेवा संस्था यांना त्यांनी विविध क्षेत्रात दिव्यांगांनी केलेल्या लक्षणीय कामगिरीबद्दल गौरवान्वित करण्यासाठी त्यांना पुरस्कार देणे.<br><br>**पात्रतेचे निकष :**<br>१. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे<br>२. अर्जदार किमान 40% दिव्यांग असला पाहिजे<br>३. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज भरून, तो अर्ज संबंधित जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद / सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर ह्यांच्याकडे सादर करणे.<br><br>**योजनेचा प्रकार:** सामाजिक प्रोत्साहन.<br><br>**संपर्क कार्यालय:** जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर.<br><br>**लाभार्थी :**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ दिव्यांग प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती.<br><br>**लाभाचे स्वरूप :**<br>१. सर्वोत्कृष्ठ कर्मचारी (सर्व प्रवर्ग) पुरस्कारांची संख्या :- १२ |

| | | |
|---|---|---|
| | | २. पुरस्काराचे स्वरूप :- रु.१०,०००/- रोख, आदेशन पत्र आणि प्रमाणपत्र.<br>३. सर्वोत्कृष्ठ नियोक्ता (शासकीय / सार्वजनिक / खासगी क्षेत्र ) पुरस्कारांची संख्या :- २<br>४. पुरस्काराचे स्वरूप :- रु. २५,०००/- रोख, स्मृतिचिन्ह, आदेशन पत्र आणि प्रमाणपत्र.<br><br>**अर्ज कसा करावा:** विहित नमुन्यामध्ये अर्ज दाखल करावा. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे, परिचयपत्र, अपंगत्व क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची कागदपत्रे जोडावीत. |
| ११. | **दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राज्य स्तरीय क्रिडा स्पर्धा** | **संदर्भ :** शासन निर्णय इडीडी-२०१०/प्र.क्र.१२१/सुधार-२, दि.-१३.१०.२०१०.<br>**अर्थ सहाय्य :** राज्य सरकार.<br>**योजनेचा उद्देश :** दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा भावनेला प्रोत्साहन देणे आणि त्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे.<br><br>**पात्रतेचे निकष :**<br>१. वार्षिक क्रीडा प्रकारात जिल्हास्तरीय उत्कृष्ट कामगिरी.<br>२. किमान ४०% दिव्यांगत्व असणे आवश्यक आहे<br>३. महाराष्ट्राचा राज्याचा रहिवासी असणे आवश्यक.<br><br>**योजनेचा प्रकार:** सामाजिक समावेशकता.<br><br>**संपर्क कार्यालय:** जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर.<br><br>**लाभार्थी :**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ दिव्यांग प्रवर्गामधील दिव्यांगांच्या विशेष शाळांतील दिव्यांग विद्यार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | | **लाभाचे स्वरूप :**<br>१. सरकारी आणि निमसरकारी आस्थापनांच्या नोकऱ्यांमध्ये ५ टक्के आरक्षण.<br>२. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विशेष क्रीडा, एबी-लाइम्पिक यासाठी पात्र खेळाडू.<br>**अर्ज कसा करावा:** विहित नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रासहित अर्ज दाखल करावा. |
| १२. | **अनाथ बौध्दीक अक्षम मुलांसाठी बालगृहे योजना संलग्न विशेष शाळा आणि विशेष प्रशिक्षण केंद्रे संलग्न.** | **संदर्भ :** शासन निर्णय इडीडी-२०१३/प्र.क्र.२७६/अ.क्र., दि.-३०.०१.२०१४.<br><br>**अर्थ सहाय्य :** विनाअनुदानित संस्था वगळता राज्य सरकार.<br><br>**योजनेचा उद्देश :** अनाथ बौद्धिक अपंग व्यक्तींची काळजी आणि संरक्षण प्रदान करणे आणि विशेष शिक्षण आणि प्रशिक्षण प्रोत्साहित करणे.<br><br>**पात्रतेचे निकष :**<br>१. बौद्धिक दिव्यांगत्व असलेले मूल अनाथ असावे.<br>२. बाल न्याय अधिनियमांतर्गत स्थापन बाल कल्याण समितीच्या योग्य आदेशानुसार प्रवेश घ्यावा.<br>३. सक्षम वैद्यकीय मंडळाने किमान ४०% बौद्धिक दिव्यांगत्व प्रमाणित केले असले पाहिजे.<br><br>**योजनेचा प्रकार:** अनाथ बौद्धिक अपंग व्यक्तींची काळजी आणि संरक्षण प्रदान करणे आणि विशेष शिक्षण आणि प्रशिक्षण.<br><br>**संपर्क कार्यालय:** जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर. |

| | | |
|---|---|---|
| | | **लाभार्थी** :दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, बौध्दिक अक्षम व अनाथ दिव्यांग व्यक्ती.<br><br>**लाभाचे स्वरूप :**<br>१. प्रवेश योग्य स्वरूपात मोफत विशेष शिक्षण आणि प्रशिक्षण.<br>२. मोफत निवास आणि बोर्डिंग.<br>३. मोफत अभ्यास साहित्य.<br>४. मोफत गणवेश.<br>५. प्रशिक्षित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी.<br>६. बौध्दिक अक्षमतेनुसार मोफत वैद्यकीय उपचार आणि उपचार.<br>७. विशेष शाळाद्वारे ०६ ते १८ वयोगटातील बौध्दिक दिव्यांग अक्षम मुलांसाठी विशेष शिक्षण आणि विशेष प्रशिक्षण केंद्रांद्वारे वय वर्षे १८ व त्यावरील जास्त वयाच्या व्यक्तीसांठी विशेष प्रशिक्षण.<br>८. बौद्धिक दिव्यांगत्वासाठी अनुदानित एमडीसी गृहांमध्ये परिपोषणापोटी संस्थेला दरमहा प्रति दिव्यांग व्यक्ती रू. २४५०/- रुपये दिले जातात.<br><br>**अर्ज कसा करावा:** बाल न्याय अधिनियमांतर्गत स्थापित बाल कल्याण समितीच्या सुयोग्य आदेशानुसार प्रवेश घेण्याकरीता जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर यांच्या मार्फत संपर्क साधावा. |
| १३. | **मानसिक आरोग्य मुक्त व्यक्तींकरीता पुनर्वसन गृहांची योजना** | **संदर्भ :** शासन निर्णय दिव्यांग-२०१९/प्र.क्र.१०३/दि.क्र.-२, दि.- ०१.०९.२०२४.<br><br>**अर्थ सहाय्य :** राज्य सरकार. |

| | | |
|---|---|---|
| | | **योजनेचा उद्देश :** मानसिक आजारातून ज्या व्यक्ती बऱ्या झालेल्या आहेत, त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना स्विकारण्यास नकार दिलेला आहे, प्रादेशिक मानसिक रुग्णालयात जास्त काळ राहिले आहेत आणि त्यांना पुढील उपचारांची आवश्यकता नाही अशा व्यक्तींच्या पुनर्वसनासह त्यांची काळजी आणि संरक्षण प्रदान करणे.<br>**पात्रतेचे निकष :**<br>१. मानसिक आजारातून ज्या व्यक्ती बऱ्या झालेल्या आहेत, त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना स्विकारण्यास नकार दिलेला आहे, प्रादेशिक मानसिक रुग्णालयात जास्त काळ राहिले आहेत आणि त्यांना पुढील उपचारांची आवश्यकता नाही, ते पुनर्वसन गृहात प्रवेश घेण्यास पात्र असतील.<br>२. पुनर्वसनासाठी पात्रतेचे प्रमाणपत्र राज्यातील संबंधित प्रादेशिक मानसिक रुग्णालयाच्या सक्षम वैद्यकीय अधिका-यांनी प्रमाणित केले असले पाहिजे.<br><br>**योजनेचा प्रकार:** मानसिक आरोग्य मुक्त व्यक्तींकरीता व्यक्तींची काळजी आणि संरक्षण प्रदान करणे आणि विशेष शिक्षण आणि प्रशिक्षण.<br><br>**संपर्क कार्यालय:** राज्यातील संबंधित प्रादेशिक मानसिक रुग्णालयाचे अधिक्षक. (नागपूर,पुणे, ठाणे आणि रत्नागिरी)<br><br>**लाभार्थी** :दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, मानसिक आजारातून ज्या व्यक्ती बऱ्या झालेल्या आहेत, त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना स्विकारण्यास नकार दिलेला आहे, प्रादेशिक मानसिक रुग्णालयात जास्त काळ राहिले आहेत आणि त्यांना पुढील उपचारांची आवश्यकता नाही अशी व्यक्ती.<br><br>**लाभाचे स्वरूप :**<br>१. मोफत निवास आणि बोर्डिंग. |

| | | |
|---|---|---|
| | | २. मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण.<br>३. प्रशिक्षित कर्मचारी.<br>४. मोफत वैद्यकीय उपचार आणि भौतिकोपचार.<br>५. वय वर्षे १८ आणि त्यापेक्षा जास्त वयाचे व्यक्तींना कौशल्य विकास प्रशिक्षण.<br>६. मनोरंजन आणि क्रीडा.<br><br>**अर्ज कसा करावा:** राज्यातील संबंधित प्रादेशिक मनोरूग्णालयाकडून केलेली योग्य ती शिफारस विचारात घेऊन शासनामार्फत प्रवेश घ्यावा. |
| १४. | **जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र** | **संदर्भ :** शासन निर्णय अपंग-२००६/प्र.क्र.४/अ.क्र.-२, दि.-१२.०७.२००७.<br><br>**अर्थ सहाय्य :** राज्य सरकार.<br><br>**योजनेचा उद्देश :** जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विरार, जि. पालघर यांच्यामार्फत राज्यातील सर्व अपंग व्यक्तींना सहाय्यक साधने व उपकरणे पुरविणे.<br>**पात्रतेचे निकष :**<br>१. सक्षम वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केलेल्या सर्व प्रकारच्या दिव्यांग व्यक्ती, ज्यांचे दिव्यांगत्व किमान ४०% आहे.<br>२. महाराष्ट्राचा राज्याचा रहिवासी असणे आवश्यक.<br>३. केंद्र सरकारच्या एडीप योजनेंतर्गत वार्षिक उत्पन्न रू. १५,०००/- च्या मर्यादेपर्यंत संपूर्ण सवलत.<br>४. केंद्र सरकारच्या एडीआयपी योजनेंतर्गत वार्षिक उत्पन्न रू. १५,०००/- ते रू. २०,०००/- पर्यंतच्या मर्यादेत अर्धी सवलत.<br>५. रु. २०, ०००/-पेक्षा जास्त उत्पन्न असल्यास सवलत नाही.<br>**योजनेचा प्रकार:** राज्यातील सर्व अपंग व्यक्तींना सहाय्यक साधने व उपकरणे पुरविणे. |

| | | |
|---|---|---|
| | | **संपर्क कार्यालय:** उपायुक्त, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विरार, जि. पालघर<br><br>**लाभार्थी :** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, ज्यांना सहाय्यक साधने व उपकरणांची आवश्यकता आहे अशा दिव्यांग व्यक्ती.<br>**लाभाचे स्वरूप :**<br>१. मोफत समुपदेशन.<br>२. प्रशिक्षित कर्मचारी.<br>३. दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार मोफत वैद्यकीय उपचार भौतिकोपचार.<br>४. मदत आणि उपकरणे, वर नमूद केलेल्या उत्पन्नाच्या मर्यादेच्या अधीन आहेत.<br>**अर्ज कसा करावा:** विहित नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रासहित अर्ज दाखल करावा.<br>Email - dro.sj@maharashtra.gov.in |

******

# महाराष्ट्र राज्यात राज्य शासनाच्या इतर विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे संकलन / तपशील

*************************************************************

| अ.क्र. | योजनेचे नांव | विवरण / योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १. | **संजय गांधी निराधार योजना** | **संदर्भ :** शासन निर्णय विघयो-२०१०/प्र.क्र.१७५/विघयो.-२, दि.- २६.१०.२०१०.<br><br>**अर्थ सहाय्य :** राज्य सरकार (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग).<br><br>**योजनेचा उद्देश :** दिव्यांग व्यक्तींना सामाजिक सुरक्षितता पुरविणे.<br><br>**पात्रतेचे निकष :**<br>१. महाराष्ट्रातील रहिवासी असणे आवश्यक.<br>२. किमान ४०% अपंगत्व.<br>३. जन्मतारीख पुरावा.<br>४. जर १८ वर्षांपेक्षा कमी वयाचे असेल तर कायदेशीर पालकांनी अर्ज करावा.<br>५. वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ५०, ०००/-.<br>६. इतर संबंधित कागदोपत्री पुरावे आवश्यक आहेत.<br><br>**योजनेचा प्रकार:** सामाजिक सुरक्षितता.<br><br>**संपर्क कार्यालय:** जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर.<br><br>**लाभार्थी :** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे दिव्यांग व्यक्ती. |

| | | |
|---|---|---|
| | | **लाभाचे स्वरूप :**<br>या योजनेंतर्गत दरमहा रु. १५००/- दिव्यांग पेन्शन.<br><br>**अर्ज कसा करावा:** विहित नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रासहित अर्ज दाखल करावा. |

# महाराष्ट्र राज्यात दिव्यांगांसाठी अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या केंद्र सरकारच्या योजनांचे संकलन / तपशिल

(माहीतीचे माध्यम – दिव्यांग कल्याण विभाग, महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळ)

Link - https://divyangkalyan.maharashtra.gov.in/mr/provider/%e0%a4%95%e0%a5%87%e0%a4%82%e0%a4%a6%e0%a5%8d%e0%a4%b0-%e0%a4%b8%e0%a4%b0%e0%a4%95%e0%a4%be%e0%a4%b0-mr/)

*************************************************************

| अ.क्र. | योजनेचे नांव | विवरण / योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १. | **जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र योजना** | **अर्थ सहाय्य :** केंद्र शासन<br>**लाभाचे स्वरूप -**<br>जिल्हा अपंगत्व पुनर्वसन केंद्रांसाठी निधी दीनदयाळ दिव्यांग पुनर्वसन योजनेअंतर्गत पुरवला जाईल. जोपर्यंत, केंद्रांसंबंधी संबंधी इ-अनुदान संस्थळ वरती वेगळी सोय केली जात नाही, तोपर्यंत ऑफ लाइन प्रस्ताव स्वीकारले जातील. केंद्रासाठी अनुदान अग्रिमरक्कमे – सह – परिपूर्ती तत्वावर दीनदयाळ दिव्यांग पुनर्वसन योजनेअंतर्गत पुरवले जाईल.<br><br>**जिल्हा अपंगत्व पुनर्वसन केंद्रांची प्रमुख वैशिष्ट्ये –**<br>१. जिल्हा अपंगत्व पुनर्वसन केंद्रांची स्थापना: योजनेचा उद्देश भारताच्या प्रत्येक जिल्ह्यात अशा केंद्रांची स्थापना आणि देखभाल करणे. ह्या केंद्रांवर, दिव्यांग व्यक्तींना, एकाच ठिकाणी, विविध पुनर्वसन सेवा आणि सुविधा मिळतील.<br>२. सर्वसमावेशक पुनर्वसन सेवा: जिल्हा अपंगत्व पुनर्वसन केंद्रांकडून विविध सेवा पुरवल्या जातात, ज्या वेगवेगळ्या अपंगत्वानी ग्रासलेल्या व्यक्तींच्या भिन्न गरजा पूर्ण करु शकतात. यामध्ये वैद्यकीय चिकित्सा, उपचार सत्रे, समुपदेशन, सहायक उपकरणे आणि साधने, कौशल्य विकास कार्यक्रम आणि शैक्षणिक सहाय्यता यांचा समावेश होतो.<br>३. लवकर ओळख आणि उपचार: लहान मुलांच्या अपंगत्वाच्या लवकर ओळखण्यामध्ये आणि योग्य उपचार पुरवण्यामध्ये, जिल्हा अपंगत्व पुनर्वसन केंद्रे महत्वाची भूमिका निभावतात. दिव्यांग मुलांच्या सर्वांगीण |

| | | |
|---|---|---|
| | | विकासासाठी आणि चांगल्या परिणामांसाठी, लवकर उपचार (होणे) महत्वाचे असते.<br>४. व्यावसायिक कौशल्य: या केंद्रांवरचा कर्मचारीवृंद व्यावसायिक आणि विविध क्षेत्रात प्रवीण असतो, जसे की, डॉक्टर, उपचारक, विशिष्ठ शिक्षक, व्यावसायिक प्रशिक्षक. दिव्यांग व्यक्तींसाठी वैयक्तिक पुनर्वसन योजना तयार करण्यासाठी हे व्यावसायिक एकत्र काम करतात.<br>५. जागरूकता आणि संवेदीकरण: जिल्हा अपंगत्व पुनर्वसन केंद्रे समाजामध्ये जागरूकता कार्यक्रम आणि संवेदीकरण मोहिमांचे आयोजन करतात, ज्याद्वारे दिव्यांग व्यक्तींबद्दल आकलन आणि स्वीकृतीला प्रोत्साहन मिळेल.<br><br>**सहभाग आणि संपर्कजाळे (नेटवर्किंग):** जिल्हा अपंगत्व पुनर्वसन केंद्रे, विविध शासकीय आणि अशासकीय संस्थांच्या सहकार्याने, दिव्यांग व्यक्तींच्या लाभासाठी, सेवांचे प्रभावी वितरण आणि उपलब्ध संसाधनांचा पुरेपूर उपयोग होईल याची काळजी घेतात.<br>**योजनेचा प्रकार :** कल्याण योजना<br>**योजने अंतर्गत अर्ज करण्याची प्रक्रिया :**<br>**नवीन प्रस्तावासाठी –**<br>१. नवीन जिल्हा अपंगत्व पुनर्वसन केंद्रासाठीचा प्रस्ताव, राज्य शासनाच्या शिफारशीसह, जिल्हा दंडाधिकारी / जिल्हाधिकाऱ्यांनी सादर करावा.<br>२. पडताळणी समिति सर्व नव्या प्रस्तावाची तपासणी करेल.<br>३. पडताळणी समितीच्या शिफारशीनंतर, कार्यक्रम विभागाकडून, केंद्राच्या प्रस्तावाच्या अंदाजाच्या 50% पर्यन्त अग्रिम रक्कम (आवर्ती आणि अनावर्ती), त्या वर्षाकरता, दिली (सोडली) जाईल. तथापि, रक्कम सोडण्याची यंत्रणा, सीएनए च्या सूचनांचे पालन करेल, म्हणजेच,पहिल्यांदा 25% आणि नंतर दर वेळेला 25%, 75% उपयोजन प्रमाणपत्र व समाधानकारक तपासणी |

| | | |
|---|---|---|
| | | यादीतील कागदपत्रे आणि सामान्य आर्थिक नियम आवश्यकता पूर्ण केल्यानंतर दिले जातील.<br>४. उर्वरित ग्राह्य अनुदान, लेखपरीक्षित खाती आणि उपयोजन प्रमाणपत्र इ. मिळाल्यावर दिली जाईल.<br>**चालू प्रस्तावासाठी –**<br>१. जिल्हा अपंगत्व पुनर्वसन केंद्राने, जिल्हा दंडाधिकारी / जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीसह, प्रस्ताव सादर करावा.<br>२. कार्यक्रम विभागाकडून, खर्चाच्या 75% पर्यन्त अग्रिम रक्कम (नियमानुसार), त्या वर्षाकरता, दिली (सोडली) जाईल. तथापि, रक्कम सोडण्याची यंत्रणा, सीएनए च्या सूचनांचे पालन करेल, म्हणजेच,पहिल्यांदा 25% आणि नंतर दर वेळेला 25%, 75% उपयोजन प्रमाणपत्र व समाधानकारक तपासणी यादीतील कागदपत्रे आणि सामान्य आर्थिक नियम आवश्यकता पूर्ण केल्यानंतर दिले जातील.<br>३. उर्वरित ग्राह्य अनुदान, शासनाच्या शिफारशीसह, लेखापरीक्षित खाती आणि उपयोजन प्रमाणपत्र, इ. मिळाल्यावर दिली जाईल.<br>**लाभार्थी:**<br>अंमलबजावणी करणारी संस्था शक्यतो जिल्हा व्यवस्थापन गट (डीएमटी) कदाचित केंद्र चालवेल, किंवा राज्य शासनाच्या स्वायत्त / अर्ध-स्वायत्त संस्था, किंवा चांगला पूर्व इतिहास असणारी, आणि केंद्र सुरुवातीपासून नीट चालवू शकणारी, एखादी नामांकित असरकारी संघटना. जिल्हा व्यवस्थापन गट, स्थानिक प्रसिद्धी माध्यमांद्वारे, इच्छुक, नोंदणीकृत संघटनांकडून प्रस्ताव मागवून घेईल आणि त्यामधून सर्वात जास्त पात्र संघटनेची निवड करेल. राज्ये, विद्यमान अधिनियमानुसार, एखादी राज्य स्तरीय संस्था / सोसायटी, स्थापन करण्याचा विचार करु शकतात जिच्या शाखा प्रत्येक जिल्ह्यात असतील आणि अंमबाजवणी करणारी संस्था म्हणून, केंद्र, प्रभावीपणे चालवू शकतील. |

| | | |
|---|---|---|
| | | **अर्ज कसा करावा** - वर नमूद केल्याप्रमाणे. |
| २. | **दिव्यांग व्यक्तींना स्वैच्छिक कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी दीनदयाळ दिव्यांगजन पुनर्वसन योजना (डीडीआरएस योजना)** | **अर्थ सहाय्य :** केंद्र शासन<br>**पात्रता निकष :** खालील श्रेणींमधील संघटना, दीनदयाळ दिव्यांगजन पुनर्वसन योजनेअंतर्गत, आर्थिक सहायतेकरता, अर्ज करण्यासाठी पात्र ठरतील:<br>१. सोसायटी नोंदणी अधिनियम,1860 (1860 चा XXI) किंवा इतर संबंधित राज्य / केंद्रशासित प्रदेशाचा अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत संघटना, किंवा<br>२. भारतीय न्यास अधिनियम 1882 अथवा त्या वेळेला प्रचलित असलेला एखादा समान अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत न्यास किंवा<br>३. कंपनी अधिनियम 2013 च्या कलम 8 खाली किंवा त्या वेळेला प्रचलित असलेला एखादा संबंधित अधिनियमाखाली नोंदणीकृत एखादी ना-नफा संस्था.<br>**दिले जाणारे लाभ**<br>१. कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या पात्र संस्थांना, सक्षम प्राधिकाऱ्या कडून, त्यांचा प्रस्ताव मान्य झाल्यानंतर, या सुधारित योजनेमध्ये नमूद, खर्च-मानकांवर अवलंबीत रकमेच्या 90% रकमेसाठी पात्र ठरतील. उर्वरित 10% प्रकल्पाची किंमत संबंधित कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना, स्वतःच्या साधनांतून भरावी लागेल.<br>२. विशेष क्षेत्रांमध्ये स्थित असणाऱ्या प्रकल्पासाठी, सुधारित खर्च-मानकांवर अवलंबीत रकमेच्या 100% रक्कम पात्र ठरेल.<br>**एका आर्थिक वर्षात, त्याच वर्षातील, अनुदान प्रस्तावासाठीचे सहायक अनुदान, परिपूर्तीच्या आधारावर खालील पद्धतीने दिले जाईल:-**<br>१. अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून, अर्ध-वार्षिक लेखापरीक्षित खाती मिळाल्यानंतर, ग्राह्य सहायक अनुदानाची 50% पर्यन्त (रक्कम) दिली जाईल. उर्वरित |

| | | |
|---|---|---|
| | | सहायक अनुदानाची रक्कम, अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून, पूर्ण आर्थिक वर्षाची लेखापरीक्षित खाती सादर झाल्यानंतर दिली जाईल. किंवा,<br>२. अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून, 9 (नऊ) महिन्यांची लेखापरीक्षित खाती मिळाल्यानंतर, ग्राह्य सहायक अनुदानाची 75% पर्यन्त (रक्कम) दिली जाईल. उर्वरित सहायक अनुदानाची रक्कम, अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून, पूर्ण आर्थिक वर्षाची लेखापरीक्षित खाती सादर झाल्यानंतर दिली जाईल. किंवा<br>३. अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून , पुढील आर्थिक वर्षाची लेखापरीक्षित खाती, ज्यामध्ये, अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेने केलेला खर्च नमूद असेल, सादर झाल्यानंतर, ग्राह्य सहायक अनुदानाची 100% पर्यन्त रक्कम दिली जाईल.<br>**योजनेचा प्रकार** - कल्याण योजना<br>**योजने अंतर्गत अर्ज करण्याची प्रक्रिया** - ह्या बद्दल जास्त माहिती त्यांच्या संकेतस्थळावर मिळू शकेल.<br>**लाभार्थी:**<br>सोसायटी नोंदणी अधिनियम,1860 (1860 चा XXI) किंवा इतर संबंधित राज्य / केंद्रशासित प्रदेशाचा अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत संघटना, किंवा, भारतीय न्यास अधिनियम 1882 अथवा त्या वेळेला प्रचलित असलेला एखादा समान अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत न्यास किंवा कंपनी अधिनियम 2013 च्या कलम 8 खाली किंवा त्या वेळेला प्रचलित असलेला एखादा संबंधित अधिनियमाखाली नोंदणीकृत एखादी ना-नफा संस्था.<br>**फायदे:**वर नमूद केल्याप्रमाणे<br>**अर्ज कसा करावा:** वर नमूद केल्याप्रमाणे |
| **३.** | **अपंग व्यक्तींचे हक्क अधिनियम** | **अर्थ सहाय्य :** केंद्र शासन |

| | | |
|---|---|---|
| | 2016 च्या **अंमलबजावणीसाठी (सिपडा)योजना** | **दिले जाणारे लाभ** - अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला, खालील विविध उपक्रमांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाईल —<br>१. दिव्यांग व्यक्तींसाठी, अडथळा मुक्त वातावरण तयार करून देणे, ज्यामध्ये, शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक आणि प्रशिक्षण संस्था, कार्यालये आणि सार्वजनिक इमारती, मनोरंजन क्षेत्रे, आरोग्य केंद्रे आणि रुग्णालये इ. ठिकाणी असे वातावरण तयार करण्यासाठी संधी मिळवून देणे समाविष्ट असेल. यामध्ये, उतरंड, कठडा, उदवाहन साठी तरतूद, चाकांची खुर्ची वापरणाऱ्यांसाठी शौचालयांचे रुपांतर, ब्रेल माहिती फलक आणि श्रवण संदेशक, स्पर्शग्राही तळजमीन, चाकांची खुर्ची वापरणाऱ्यांच्या सुविधेसाठी पदपथावर उतार, अंध अथवा कमी दृष्टी असणाऱ्यांसाठी झेब्रा क्रॉसिंग वरती खाचा पाडणे, अंध अथवा कमी दृष्टी असणाऱ्यांसाठी रेल्वे फलाटावर खाचा पाडणे आणि अपंगत्वाची योग्य चिन्हे तयार करणे इ.चा समावेश होतो.<br>२. दिव्यांग व्यक्तींसाठी, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एन.आय.सी) आणि भारत सरकारच्या, प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाद्वारे, भारत सरकार संकेतस्थळासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र/राज्य आणि जिल्हा स्तरांवरील संकेतस्थळे सुलभ करून देणे, जी त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.<br>३. दिव्यांग व्यक्तींसाठी कौशल्य विकास कार्यक्रम.<br>४. अंगभूत वातावरण, वाहतूक व्यवस्था आणि माहिती व संवाद परिसंस्थेची (इको-सिस्टम) सुगमता वाढवणे. विभागातर्फे, “सुगम्य भारत अभियान’ अशी संकल्पना, एका अग्रगण्य देशव्यापी मोहिमेच्या स्वरूपात, विकसित करण्यात आली आहे. या अभियानाचा उद्देश, वैश्विक सुगमता आणणे असा असून त्यायोगे दिव्यांग व्यक्तींना |

| | | |
|---|---|---|
| | | समान संधी उपलब्ध होतील, एक स्वतंत्र आयुष्य जगता येईल आणि एका सर्वसमावेशक समाजात, आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये पुरेपूर सहभाग घेता येईल. या अभियानामध्ये सुगमता अंकेक्षण (ऑडिट), आणि सार्वजनिक जागा / अंगभूत वातावरण, वाहतूक व्यवस्था आणि माहिती व संवाद परिसंस्था (इको-सिस्टम) पूर्णपणे सुगम करणे अशा बाबींचा समावेश आहे.<br>५. संयुक्त पुनर्वसन केंद्र / प्रादेशिक केंद्र / कृती गट आणि जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रांना समर्थन देणे आणि जिथे आणि जेव्हा गरज असेल तिथे आणि तेव्हा नवीन केंद्रे स्थापन करणे.<br>६. राज्य शासनाला, अपंगत्व प्रमाणपत्रे प्रदान करण्यासाठी शिबिरे आयोजित करायला सहाय्य करणे.<br>७. विविध भागधारकांसाठी जनजागृती मोहीम आणि संवेदना कार्यक्रम तयार करणे आणि इतर माहिती, शिक्षण आणि संवाद<br>८. अपंगत्व मुद्यांवरील माहितीचा प्रसार, समुपदेशन आणि सहायक सेवा प्रदान करणे यासाठी संसाधन केंद्रे उभी करणे व त्यांना सहाय्य करणे.<br>९. वाचनालयांची, दोन्ही भौतिक / अंकीय (डिजिटल), आणि इतर ज्ञानसाधन केंद्रांची सुगमता वाढवणे.<br>१०.दिव्यांग पुनर्वसनाच्या क्षेत्रामध्ये संशोधन आणि विकास कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे.<br>११.दिव्यांग मुलांच्या शाळा-पूर्व प्रशिक्षणाला प्रोत्साहन देणे, पालकांसाठी समुपदेशन, काळजीवाहकांसाठी (काळजी घेणारे) प्रशिक्षण, शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आणि 0-5 वर्षे वयाच्या मुलांसाठी लवकरात लवकर निदान शिबिरे आणि लवकर उपचार.<br>१२. जिल्हा मुख्यालय / इतर जागा, जिथे सरकारी वैद्यकीय महाविद्यालय आहे, अशा ठिकाणी निदान / उपचार केंद्रे स्थापन करणे ज्यायोगे कर्णबाधित बाळांना आणि लहान |

| | | |
|---|---|---|
| | | मुलांना, सामान्य शाळेसाठी आवश्यक कौशल्य मिळवण्यासाठी सहाय्य करणे.<br>१३. दिव्यांग व्यक्तींसाठीच्या, राज्य आयुक्तालय कार्यालयासाठी पायाभूत सुविधा (निर्माण) करण्याकरता, राज्य शासन/ केंद्रशासित प्रदेशांना अनुदान देणे.<br>१४. दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ मनोरंजन केंद्रे बांधणे जिथे योग्य सरकारी / स्थानिक संस्थांची स्वतःची जागा असेल.<br>१५. राष्ट्रीय / राज्य स्तरावरील क्रीडा कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे.<br>१६. दिव्यांग व्यक्तींसाठी वैश्विक ओळखपत्राची माहिती आणि सर्वेक्षण<br>१७. अधिनियमामध्ये नमूद आणखी इतर कार्यक्रमांसाठी आर्थिक सहाय्यता, असे कार्यक्रम ज्यांच्यासाठी विभागाच्या विद्यमान योजनांमध्ये आर्थिक सहाय्यतेची तरतूद केली नाही आहे.<br>**योजनेचा प्रकार** - कल्याण योजना<br>**लाभार्थी:** योजनेची अंमलबजावणी, खाली नमूद केलेल्या अंमलबजावणी संस्थातर्फे केली जाईल - राज्य शासन / केंद्रशासित प्रदेशाचा विभाग स्वायत्त संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, केंद्र शासन किंवा राज्य शासनाने स्थापित केलेल्या वैधानिक संस्था राष्ट्रीय संस्था, संयुक्त प्रादेशिक केंद्र, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, प्रादेशिक केंद्र, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयांतर्गत कृती गट (आउटरीच केंद्रे) सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860, भारतीय सुविधाधिकार अधिनियम 1882 आणि कंपनी अधिनियम 1956, यांच्या अंतर्गत नोंदणीकृत संस्था. केंद्र शासन किंवा राज्य शासनाकडून मान्यताप्राप्त क्रीडा संस्था.<br>**फायदे:** वर नमूद केल्याप्रमाणे<br>**अर्ज कसा करावा** - नमूद उपक्रम करण्यासाठी, योजनेअंतर्गत पात्र ठरणारी एखादी संघटना / संस्था आर्थिक |

| | | |
|---|---|---|
| | | सहाय्यता इच्छित असेल, तर त्यांना एक विस्तृत प्रस्ताव, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयांतर्गत दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग, नवी दिल्ली यांच्याकडे पाठवावा लागेल. ह्या प्रस्तावात, इतर गोष्टींबरोबर, प्रस्तावित कामाचे / उपक्रमांचे विस्तृत वर्णन, व्याप्ती, लक्ष्यित भागधारक, एकूण गुंतवणूक खर्च, प्रकल्पाला लागणाऱ्या वेळेचा आराखडा आणि प्रकल्पाचा अंदाज असायला हवे. हा प्रस्ताव, सहाय्यता मागणाऱ्या संस्था / संघटनेच्या प्रमुखच्या संमतीने पाठवलेला असावा. प्रस्तावामध्ये, या योजनेअंतर्गत पूर्वी केलेल्या कामाचे तपशील आणि स्थिति सुद्धा द्यायला हवेत. |
| ४. | **दिव्यांग व्यक्तींना साधने आणि उपकरणांच्या खरेदी आणि (जागेवर) बसवण्यासाठी आर्थिक सहाय्य योजना (एडीप योजना)** | **अर्थ सहाय्य :** केंद्र शासन<br>**पात्रता निकष: अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची पात्रता** —योजनेची अंमलबजावणी करण्याकरता खालील संस्था पात्र आहेत. ह्या संस्था, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या अंतर्गत, दिव्यांगजन सशक्तिकरण विभागाच्या वतीने काम करतील. ह्या संस्थांना खालील नियम व अटी पूर्ण कराव्या लागतील.<br>१. सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 अंतर्गत नोंदणीकृत संस्था आणि जर असल्यास त्यांच्या स्वतंत्रपणे नोंदणीकृत शाखा.<br>२. नोंदणीकृत धर्मादाय विश्वस्तव्यवस्था<br>३. भारतीय रेड क्रॉस संस्था आणि जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी / जिल्हा विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील, इतर स्वायत्त संस्था.<br>४. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय / आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करणाऱ्या राष्ट्रीय / सर्वोच्च संस्था, संयुक्त प्रादेशिक केंद्र, प्रादेशिक केंद्र, जिल्हा अपंग |

| | | |
|---|---|---|
| | | पुनर्वसन केंद्र, राष्ट्रीय न्यास (ट्रस्ट), भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एएलआयएमसीओ).<br>५. राष्ट्रीय / राज्य अपंग विकास महामंडळे.<br>६. स्थानिक संस्था – जिल्हा परिषद, नगरपालिका, जिल्हा स्वायत्त विकास परिषदा, पंचायती इ.<br>७. राज्य / केंद्रशासित प्रदेश / केंद्र शासनाने शिफारस केलेली आणि स्वतंत्र संस्था म्हणून नोंदणीकृत असणारी रुग्णालये.<br>८. नेहरू युवा केंद्र<br>९. भारतीय सरकारच्या, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या, दिव्यांगजन सशक्तिकरण विभागास योग्य वाटतील अशा इतर संस्था.<br>१०.साधने आणि सहाय्यक उपकरणांच्या व्यावसायिक उत्पादन आणि पुरवाथ्यासाठी, या योजनेअंतर्गत अनुदान मिळणार नाही.<br>**अंमलबजावणी करणाऱ्या नवीन संस्थांना मान्यता देताना, अशा संस्थांना प्राधान्य दिले जाईल ज्या :**<br>१. व्यावसायिकदृष्ट्या पात्र कर्मचाऱ्यांना, (भारतीय पुनर्वसन परिषदेकडून मान्यताप्राप्त अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या), कामावर ठेऊन, आवश्यक साधने/उपकरणांची पारख आणि निश्चितीकरण, असे उपकरण बसवणे आणि त्याची काळजी अशा बाबतींमध्ये आपले, व्यावसायिक / तांत्रिक कौशल्य वाढवतील (अशा संस्था)<br>२. एडीआयपी योजनेअंतर्गत, दिव्यांग व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या, साधने / उपकरणांचे उत्पादन, बसवणे आणि देखभालीसाठी, यंत्रसामग्री आणि उपकरणांसारखी पायाभूत सुविधा ताब्यात उपलब्ध ठेऊन, आयएसआय मानक आणि आयएसओ प्रमाणपत्र मिळवलेली साधने आणि सहाय्यक उपकरणे बनवण्यासाठी सक्षम आहे (अशी संस्था)<br>**लाभार्थीसाठी पात्रता निकष** |

| | | |
|---|---|---|
| | | १. कोणत्याही वयाचा भारतीय नागरीक.<br>२. 40% अपंगत्वाचे प्रमाणपत्र असणारा (प्रमाणरूप अपंगत्व).<br>३. सर्व स्त्रोतांकडून, मासिक उत्पन्न रु.30,000/- पेक्षा जास्त नसणारा.<br>४. अवलंबून असणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत, पालकांचे/पालनकर्त्यांचे मासिक उत्पन्न रु.30,000/- पेक्षा जास्त नसावे.<br>५. गेल्या तीन वर्षांमध्ये, सर्व स्त्रोतांकडून, अशा प्रकारची कुठलीही सहायता न मिळालेला. तथापि, 12 वर्षाखालील मुलांसाठी, हा सहाय्यतेचा किमान अवधि एक वर्ष असेल.<br>**दिले जाणारे लाभ :योजनेमध्ये, साधने / उपकरणे बसवण्याआधी, शस्त्रक्रियेद्वारे आवश्यक सुधारणा आणि मध्यस्थीचा समावेश आहे. यासाठी खालील तरतुदी आहेत**<br>१. **रु.** 1500/- वाचा आणि कर्णबाधित व्यक्तींसाठी.<br>२. रु. 3,000/- दृष्टीबाधित व्यक्तींसाठी.<br>३. रु. 15,000/- शारीरिक विकलांग व्यक्तींसाठी.<br>**सहाय्यतेचे प्रमाण आणि साधनांची किंमत –**<br>१. रु.15,000/- पर्यन्त किंमत असलेल्या साधने/उपकरणांची पूर्ण किंमत.<br>२. रु.15,001/- ते रु.30,000/- पर्यन्त किंमत असलेल्या साधने / उपकरणांसाठी, रु. 15,000/- पर्यन्त आर्थिक सहाय्यता.<br>३. योजनेअंतर्गत, साधने/उपकरणांची पूर्ण किंमत मिळण्याकरता, रु.22,500/- ची उत्पन्न मर्यादा.<br>४. जर, वार्षिक उत्पन्न रु.22,501/- ते रु.30,000/- पर्यन्त असेल, तर आर्थिक सहायतेची रक्कम, साधने/उपकरणांच्या किमतीच्या 50% असेल.<br>५. याशिवाय, या योजनेअंतर्गत पात्र आणि उत्पन्न मर्यादेवर अवलंबून अशा, रु.30,001/- पेक्षा महाग किमतीच्या |

| | | |
|---|---|---|
| | | उपकरणांची, कर्णशंबुक रोपण (कॉक्लियर इम्प्लांट) आणि चलित्र तिचाकी (मोटराइज्ड ट्रायसायकल) वगळून, एक यादी तयार होईल. समितीने, अशाप्रकारे सूचीबद्ध केलेल्या उपकरणांच्या किमतीच्या 50% खर्च भारत सरकारकडून केला जाईल आणि उर्वरित खर्च राज्य शासन अथवा स्वयंसेवी संघटना किंवा इतर संस्था किंवा संबंधित लाभार्थी व्यक्तीकडून केला जाईल. याकरता, मंत्रालायची संमती आवश्यक आहे आणि योजनेच्या अंदाजपत्रकाच्या 20%पर्यन्त कमाल मर्यादा आहे.<br>६. दिव्यांग व्यक्तीस, केंद्राला दिलेल्या अमर्यादित भेटी किंवा साधने/उपकरणांच्या वितरण शिबिरांना उपस्थित राहण्यासाठी, वाहतूक भत्ता म्हणून रु. 250/- आणि एका अनुरक्षकाचे (एस्कॉर्ट) भाडे दिले जाईल. यासोबत, रु.100/- खानपान खर्चासाठी, जास्तीत जास्त 15 दिवसांसाठी दिले जातील. हे दोन्ही लाभ केवळ अशा रुग्णांना मिळतील ज्यांचे एकूण उत्पन्न दर महा रु.22,500/- पर्यन्त आहे. सहायक/अनुरक्षकाला पण हेच लाभ मिळतील.<br>७. कर्णशंबुक रोपण (कॉक्लियर इम्प्लांट) – कर्णबधित लहान मुलांसाठी, कर्णशंबुक रोपण आणि शस्त्रक्रियेनंतरचे उपचार आणि पुनर्वसनासाठी, रु.7 लाखांपर्यंत (शासनाद्वारे देय) सहाय्य केले जाईल. याकरता, 1 ते 5 वर्षे वयाच्या मुलांच्या पूर्व-भाषिक कर्णबधिरत्वासाठी रु.6.00 लाख आणि 5 ते 18 वर्षांच्या मुलांच्या प्राप्त कर्णबधिरत्वासाठी रु.7.00 लाख सहाय्य दिले जाऊ शकते. दोन्ही परिस्थिती मध्ये, या आर्थिक सहायतेमध्ये रोपण उपकरणाची किंमत, शस्त्रक्रिया, उपचार, जुळवणी, प्रवास आणि रोपणाच्या आधीचे मूल्यांकन समाविष्ट आहे.<br>**योजनेचा प्रकार** - कल्याण योजना |

| | | |
|---|---|---|
| | | **योजने अंतर्गत अर्ज करण्याची प्रक्रिया :** ह्या बद्दल जास्त माहिती त्यांच्या संकेतस्थळावर मिळू शकेल.<br>**लाभार्थी:** दिव्यांग व्यक्तींना, टिकाऊ, आधुनिक आणि शास्त्रोक्त पद्धतीने निर्माण केलेली साधने आणि सहाय्यक उपकरणांचा पुरवठा करून, त्यांचे शारीरिक, सामाजिक आणि मानसिक पुनर्वसन करणे आणि त्यायोगे, अपंगत्वाचे परिणाम कमी करणे व त्यांची शैक्षणिक आणि आर्थिक क्षमता वाढवणे असे या योजनेचे उद्दिष्ट आहे.<br>**फायदे:**वर नमूद केल्याप्रमाणे<br>**अर्ज कसा करावा:** वर नमूद केल्याप्रमाणे |
| ५. | **दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रशिक्षण शिष्यवृत्ती** | **अर्थ सहाय्य :** केंद्र शासन<br>**पात्रता निकष: सर्वसाधारण पात्रता निकष –**<br>१. शिष्यवृत्ती फक्त भारतीय नागरिकांसाठी उपलब्ध आहेत.<br>२. शिष्यवृत्तीचे सर्व घटक अशा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असतील, जे योजनेचे प्रमुख निकष जसे की, 40% किंवा जास्त अपंगत्व (अपंग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 अनुसार), पूर्ण करत असतील आणि ज्यांच्याकडे, सक्षम प्राधिकार्याने, नियमानुसार, निर्गमित केलेले ग्राह्य अपंगत्व प्रमाणपत्र असेल.<br>३. समान पालकांच्या दोन पेक्षा जास्ती दिव्यांग मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. दुसरे मूल जर जुळे असेल तर ही शिष्यवृत्ती योजना त्या जुळया मुलाला/मुलीला लागू होईल.<br>४. ही शिष्यवृत्ती कुठल्याही एका इयत्तेत शिक्षण घेण्यासाठी एकाच वर्षासाठी दिली जाईल. एखादा विद्यार्थी एकाच इयत्तेत परत शिकणार असेल तर अशा दुसऱ्या किंवा नंतरच्या वर्षासाठी, त्याला/तिला, शिष्यवृत्ती मिळणार नाही.<br>५. या योजनेमधील शिष्यवृत्तीधारक आणखी कुठल्याही शिष्यवृत्ती / विद्यावेतनाचा लाभ घेऊ शकणार नाही. अशा विद्यार्थ्यांना, दुसरी शिष्यवृत्ती/विद्यावेतन स्वीकारण्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | | दिवसापासून, या योजनेखालील कुठलीही शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.<br>६. (अर्जकर्त्याकडे) शिष्यवृत्तीच्या लाभासाठी, दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्र / दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्रासाठी नावनोंदणी आवश्यक आहे.<br>**योजनेसाठी विशिष्ट पात्रता निकष –**<br>१. (ही शिष्यवृत्ती) दिव्यांगजन सशक्तिकरण विभागातर्फे निर्गमित केलेल्या, शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ठ संस्थांमधील, स्नातक आणि पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रमांसाठीच ग्राह्य असेल.<br>२. या योजनेअंतर्गत, कुठल्याही शाखेचे दूरस्थ शिक्षण / अर्ध-वेळ / सप्ताहान्त शिक्षण, शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणार नाही. याशिवाय, एका व्यक्तीस एकदाच ही सुविधा मिळत असल्यामुळे, या घटकांतर्गत दिला जाणारा लाभ, दुसऱ्या अथवा नंतरच्या लाभासाठी विचारात घेतला जाणार नाही.<br>३. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 8 लाखांपेक्षा अधिक नसावे.<br>**दिले जाणारे लाभ :** प्रमाणरूप अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या उच्च श्रेणी शिक्षण शिष्यवृत्तीच्या प्रमाणामध्ये घटकांचा समावेश आहे.<br>**योजनेचा प्रकार** - शिष्यवृत्ती<br>**लाभार्थी:** गट अ, ब आणि क मधील पदांसाठी भरती परीक्षा आणि विविध तांत्रिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आवश्यक प्रवेश परीक्षांसाठी ग्राह्य.<br>**फायदे:** वर नमूद केल्याप्रमाणे<br>**अर्ज कसा करावा:** वर नमूद केल्याप्रमाणे |
| **६.** | **दिव्यांग व्यक्तींसाठी राष्ट्रीय पाठ्यवृत्ती** | **अर्थ सहाय्य :** केंद्र शासन<br>**या योजनेमध्ये खालील बाबींचा समावेश होतो:**<br>१. विश्वविद्यालय अनुदान आयोगाकडून मान्यताप्राप्त सर्व विश्वविद्यालये / संस्था / महाविद्यालये |

| | | |
|---|---|---|
| | | २. विश्वविद्यालय अनुदान आयोग अधिनियम 1956 च्या कलम 2(फ) मध्ये अधिसूचित केलेली आणि राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषदे (एनएएसी) द्वारे वैध मान्यता असणारी सर्व केंद्र / राज्य विश्वविद्यालये (घटक आणि संलग्न संस्था समाविष्ट).<br>३. विश्वविद्यालय अनुदान आयोग अधिनियम 1956 च्या कलम 3 अंतर्गत, अभिमत विश्वविद्यालय म्हणजे केंद्र शासनाने, विश्वविद्यालय अनुदान आयोगाशी विचारविनिमय करून, अभिमत विश्वविद्यालय म्हणून नमूद केलेली आणि आणि राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषदे (एनएएसी) द्वारे वैध मान्यता असणारी उच्च शिक्षण संस्था.<br>४. राज्य / केंद्र शासनाद्वारे पूर्णपणे अनुदानित आणि पदवी प्रदान करण्यासाठी सक्षम अशी संस्था.<br>५. शिक्षण मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या राष्ट्रीय महत्व असणाऱ्या संस्था.<br>**पात्रता निकष :** सर्वसाधारण पात्रता निकष —<br>१. शिष्यवृत्ती फक्त भारतीय नागरिकांसाठी उपलब्ध आहेत.<br>२. शिष्यवृत्तीचे सर्व घटक अशा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असतील, जे योजनेचे प्रमुख निकष जसे की, 40% किंवा जास्त अपंगत्व (अपंग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 अनुसार), पूर्ण करत असतील आणि ज्यांच्याकडे, सक्षम प्राधिकार्याने, नियमानुसार, निर्गमित केलेले ग्राह्य अपंगत्व प्रमाणपत्र असेल.<br>३. समान पालकांच्या दोन पेक्षा जास्ती दिव्यांग मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. दुसरे मूल जर जुळे असेल तर ही शिष्यवृत्ती योजना त्या जुळ्या मुलाला/मुलीला लागू होईल.<br>४. ही शिष्यवृत्ती कुठल्याही एका इयत्तेत शिक्षण घेण्यासाठी एकाच वर्षासाठी दिली जाईल. एखादा विद्यार्थी एकाच इयत्तेत परत शिकणार असेल तर अशा दुसऱ्या किंवा |

| | | |
|---|---|---|
| | | नंतरच्या वर्षासाठी, त्याला/तिला, शिष्यवृत्ती मिळणार नाही.<br>५. या योजनेमधील शिष्यवृत्तीधारक आणखी कुठल्याही शिष्यवृत्ती / विद्यावेतनाचा लाभ घेऊ शकणार नाही. अशा विद्यार्थ्यांना, दुसरी शिष्यवृत्ती/विद्यावेतन स्वीकारण्याच्या दिवसापासून, या योजनेखालील कुठलीही शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.<br>६. (अर्जकर्त्याकडे) शिष्यवृत्तीच्या लाभासाठी, दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्र / दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्रासाठी नावनोंदणी आवश्यक आहे.<br>**योजनेसाठी विशिष्ट पात्रता निकष –**<br>१. पाठ्यवृत्ती अशा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असतील, जे योजनेचे प्रमुख निकष जसे की, 40% किंवा जास्त अपंगत्व (अपंग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 अनुसार), पूर्ण करत असतील आणि ज्यांच्याकडे, सक्षम प्राधिकार्याने, नियमानुसार, निर्गमित केलेले ग्राह्य अपंगत्व प्रमाणपत्र असेल.<br>२. या योजनेमधील पाठ्यवृत्ती धारक आणखी कुठल्याही शिष्यवृत्ती / विद्यावेतनाचा लाभ घेऊ शकणार नाही. अशा विद्यार्थ्यांना, दुसरी शिष्यवृत्ती/विद्यावेतन स्वीकारण्याच्या दिवसापासून, या योजनेखालील कुठलीही शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.<br>३. पाठ्यवृत्ती, अशा उमेदवारांना दिल्या जातील, जे, योजनेच्या मार्गदर्शक तत्वामध्ये संदर्भित विश्वविद्यालय/संशोधन संस्थांमध्ये, नियमित आणि पूर्णवेळ, तत्वज्ञानात पदव्युत्तर पदवी (एम.फिल)/विद्यावाचस्पती, अशा उच्च अभ्यासक्रमात शिक्षण घेत असतील.<br>४. एक अभ्यासक, एका वेळेस, एकच पाठ्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरेल. अशा अभ्यासकास, तो/ती, इतर स्त्रोतांकडून, आणखी कुठलेही आर्थिक सहाय्य / शिष्यवृत्ती / पाठ्यवृत्ती |

| | | |
|---|---|---|
| | | स्वीकारणार अथवा घेणार नाहीत, असे जाहीर करावे लागेल. म्हणजेच, शिष्यवृत्तीच्या कार्यकाळात, या योजनेअंतर्गत पाठ्यवृत्ती मिळालेल्या अभ्यासकाला, इतर स्त्रोतांकडून, दुसरी पाठ्यवृत्ती / शिष्यवृत्ती किंवा एखादी नियुक्ती, सशुल्क अथवा अन्यथा, कुठलेही मानधन, वेतन, विद्यावेतन इ. स्वीकारत येणार नाही. एक वर्षाची 'शैक्षणिक रजा' ह्याला अपवाद असेल. जर एखाद्या अभ्यासकाला आधीच एक शिष्यवृत्ती / पाठ्यवृत्ती मिळालेली असेल, तर त्याला / तिला, अश्या आधीच्या शिष्यवृत्ती / पाठ्यवृत्ती / इतर आर्थिक सहाय्याचा त्याग करावा लागेल अथवा या योजनेअंतर्गत झालेली निवड सोडून द्यावी लागेल.<br>५. जो अभ्यासक, त्याच्या / तिच्या पाठ्यवृत्ती च्या कार्यकाळातले संशोधनाचे काम पूर्ण करणार नाही, तो/ती या योजनेअंतर्गत पुनः अर्ज करण्यास अपात्र ठरेल. त्याचप्रमाणे, ज्या अभ्यासकाने, अशी पाठ्यवृत्ती , पूर्णपणे अथवा अंशतः, विद्यावाचस्पती अभ्यासक्रमासाठी वापरली असेल, तो अभ्यासक, या योजनेअंतर्गत पुनः अर्ज करण्यास अपात्र ठरेल.<br>६. विश्वविद्यालय अनुदान आयोगाद्वारे, वेळोवेळी, निर्गमित केलेल्या पाठ्यवृत्ती मार्गदर्शक तत्वानुसार, कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्ती च्या स्वरूपात पाठ्यवृत्ती मध्ये सामील होण्याच्या दोन वर्षात, पाठ्यवृत्ती धारकाच्या संशोधन कामात समाधानकारक प्रगती असेल तर त्याचा / तिचा कार्यकाल, वरिष्ठ संशोधन पाठ्यवृत्ती च्या स्वरूपात, आणखी तीन वर्षांसाठी वाढवला जाईल.<br>७. उमेदवार ज्या वर्षासाठी पाठ्यवृत्ती साठी निवडला गेला असेल, त्या वर्षाच्या 1 एप्रिलपासून किंवा तत्वज्ञानात पदव्युत्तर पदवी (एम.फिल)/विद्यावाचस्पती अभ्यासक्रमाची नोंदणीची/रुजू होण्याची तारीख, यापैकी |

| | | |
|---|---|---|
| | | जी नंतर असेल, त्या तारखेपासून, पाठ्यवृत्ती ची रक्कम अदा केली जाईल.<br>८. एकत्रित तत्वज्ञानात पदव्युत्तर पदवी (एम.फिल) आणि विद्यावाचस्पती अभ्यासक्रम किंवा विद्यावाचस्पती अभ्यासक्रमाचा कमाल कार्यकाल पाच वर्षांचा असेल. तत्वज्ञानात पदव्युत्तर पदवी (एम.फिल) अभ्यासक्रमासाठी दोन वर्षे अथवा तत्वज्ञानात पदव्युत्तर पदवीचा (एम.फिल) प्रबंध सादर करण्याची तारीख, यापैकी जी आधी असेल, त्या तारखेपासून, पाठ्यवृत्ती दिली जाईल.<br>९. तत्वज्ञानात पदव्युत्तर पदवी (एम.फिल) पासून विद्यावाचस्पती अभ्यासक्रम चालू करण्यामध्ये विरामाचा कालावधी दोन वर्षे आहे. (तत्वज्ञानात पदव्युत्तर पदवी (एम.फिल) अभ्यासक्रमाचा निकाल जाहीर होण्याची तारीख ते विद्यावाचस्पती अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याची तारीख). तथापि, पाठ्यवृत्ती चा कार्यकाल, विरामाचा कालावधी वगळता, पाच वर्षेच असेल. विरामाचा कालावधीमध्ये पाठ्यवृत्ती ची रक्कम दिली जाणार नाही.<br>१०.पाठ्यवृत्ती , विद्यावाचस्पती प्रबंध सादर करायच्या तारखेपर्यंत किंवा पाच वर्षांच्या कालावधी, यापैकी जी घटना आधी घडेल, तेवढ्या कालावधीसाठी दिली जाईल. पाठ्यवृत्ती च्या पाच वर्षांच्या कालावधीपेक्षा जास्त अवधि वाढवून मिळणार नाही.<br>११.कुठल्याही विश्वविद्यालय / महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / केंद्र, राज्य, केंद्रशासित प्रदेश शासनाच्या कर्मचाऱ्यांना, पाठ्यवृत्ती योजनेतून वगळण्यात आले आहे. जरी त्यांनी, तत्वज्ञानात पदव्युत्तर पदवी (एम.फिल)/विद्यावाचस्पती अभ्यासक्रमात शिकण्यासाठी, अध्ययन रजा किंवा असाधारण रजा घेतली असेल तरी ते अपात्रच असतील. |

१२. एका व्यक्तीस आयुष्यात एकदाच पाठ्यवृत्ती मिळत अस्लयमुळे, कुठलाही अधिछात्र दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर पाठ्यवृत्ती साठी विचारात घेतला जाणार नाही.

**दिले जाणारे लाभ:**

पाठ्यवृत्ती चे दर, विश्वविद्यालय अनुदान आयोगाच्या पाठ्यवृत्ती च्या दरांशी, सममूल्य असतील. सध्या हे दर खालीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | पाठ्यवृत्ती चे तपशील/घटक | योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | पाठ्यवृत्ती (सर्व विषयांसाठी) | @ रु.31,000/- दर महा, कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्ती च्या स्वरूपात, दोन वर्षांसाठी. @ रु. 35,000/- दर महा, वरिष्ठ संशोधन पाठ्यवृत्ती च्या स्वरूपात, त्यानंतरच्या कमाल तीन वर्षांच्या कालावधीसाठी. |
| २ | आकस्मिकता (मानवता, सामाजिक विज्ञान आणि वाणिज्य शाखांसाठी), (कला / ललित कलांसहित) | @ रु. 10,000/- प्रति वर्षी, पहिल्या दोन वर्षांसाठी @ रु. 20,500/- प्रति वर्षी, उर्वरित कार्यकालासाठी |
| ३ | आकस्मिकता, विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानासाठी | @ रु. 12,000/- प्रति वर्षी, पहिल्या दोन वर्षांसाठी @ रु. 25,000/- प्रति वर्षी, उर्वरित कार्यकालासाठी. |
| ४ | पाठक ,अनुरक्षक सहाय्यता (विश्वविद्यालय / संस्थेच्या अधीक्षण अधिकाऱ्याच्या पडताळणीनुसार) | @ रु. 2,000/- दर महा. |
| ५ | घर भाडे भत्ता (एचआरए) | भारत सरकार तर्फे निर्गमित केलेल्या नियमानुसार, काम करून (अर्थअर्जन करणाऱ्या) संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना, ज्यांना वसतिगृहात निवास दिला जाणार नाही, त्यांना ,@ 9%, 18% and 27% दराने घर भाडे भत्ता दिल जाईल. |

**टिपण –**

| | | |
|---|---|---|
| | | **(i)घर भाडे भत्यासंबंधात –**<br>१. जर, अभ्यासकास त्याच्या / तिच्या संस्थेद्वारे , वसतिगृहात निवास दिला गेला असेल, तर अभ्यासकास फक्त वसतिगृह शुल्क मिळेल, खानपान, वीज, पाणी इ. शुल्क मिळणार नाहीत.<br>२. जर, विश्वविद्यालय / संस्थेद्वारे दिलेला वसतिगृहातील निवास, उमेदवाराने नाकारला, तर तो / ती घर भाडे भत्ता मिळण्यासाठी अपात्र ठरतील.<br>३. जर, वसतिगृहात निवास उपलब्ध नसेल, तर यजमान संस्थेद्वारे एकल निवास पुरवला जाऊ शकतो. अशा परिस्थितीत, अभ्यासकाने भाडे म्हणून दिलेल्या प्रत्यक्ष रकमेची परिपूर्ती केली जाईल. ही परिपूर्ती, भारत सरकारच्या, घर भाडे भत्ता नियमाप्रमाणे, कमाल मर्यादेपर्यंत सीमित असेल.<br>४. जर, एखादा अभ्यासक त्याची / तिची राहण्याची सोय स्वतःच करणार असेल, तर तो / ती, घर भाडे भत्ता मिळण्यास पात्र ठरेल. हा घर भाडे भत्ता, भारत सरकारच्या नियमाप्रमाणे, कमाल मर्यादा आणि गावांच्या वर्गीकरणावर अवलंबून असेल.<br>५. जर, अभ्यासकाला घर भाडे भत्ता हवा असेल, तर त्याला/तिला, दर महिन्याला, विहित नमुन्यातले मासिक पुष्टीकरण प्रमाणपत्र, त्याच्या/तिच्या संस्थेकडे सादर करून, तो मागावा लागेल.<br>**(ii) इतर सुविधा, जशा की, वैद्यकीय सुविधा, प्रसूती रजेसह रजा, विश्वविद्यालय अनुदान आयोगाच्या पाठ्यवृत्ती अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शासित केल्या जातील.**<br>**योजनेचा प्रकार** - पाठ्यवृत्ती<br>**योजने अंतर्गत अर्ज करण्याची प्रक्रिया -**<br>१. विद्यार्थ्यांना, पाठ्यवृत्ती प्रदान करण्याची निवड, त्यांनी, राष्ट्रीय परीक्षण संस्थेद्वारे आयोजित, विश्वविद्यालय |

| | | |
|---|---|---|
| | | अनुदान आयोगाच्या राष्ट्रीय पात्रता परीक्षा (यूजीसी- नेट) आणि वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परीक्षांमध्ये (यूजीसी- सीएसआयआर) मिळवलेल्या गुणांवर केली जाईल. राष्ट्रीय परीक्षण संस्थेद्वारे, पात्र उमेदवारांची अखिल भारतीय गुणवत्ता यादी तयार केली जाईल. ही यादी, अशा उमेदवारांमधून तयार केली जाईल, जे 'प्रमाणरुप अपंगत्वाचे निकष' पुरे करत असतील आणि ज्यांनी दोन्ही, कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्ती आणि राष्ट्रीय पात्रता परीक्षेसाठी अर्ज केले आहेत पण फक्त राष्ट्रीय पात्रता परीक्षेसाठी पात्र ठरत आहेत.<br>२. ज्या पात्र उमेदवारांना, अजून अभ्यासक्रमात प्रवेश मिळालेला नाही, परंतु या योजनेअंतर्गत, दिव्यांग व्यक्तींसाठीच्या राष्ट्रीय पाठ्यवृत्ती साठी अर्ज भरलेला आहे, त्यांना, पहिली उपलब्ध संधी गाठून, मान्यताप्राप्त संशोधन संस्थेत, नियमित आणि पूर्ण वेळ तत्वज्ञानात पदव्युत्तर पदवी (एम.फिल)/विद्यावाचस्पती अभ्यासक्रमात प्रवेश घ्यावा लागेल. असा प्रवेश, पाठ्यवृत्ती प्रदान होण्याच्या तीन वर्षांच्या आत घ्यावा लागेल.<br>३. या योजनेअंतर्गत, पाठ्यवृत्ती प्रदान करण्याच्या आधी, उमेदवाराने सादर केलेल्या दिव्यांग प्रमाणपत्राची सत्यता, संबंधित विश्वविद्यालय / संस्थेकडून पडताळून बघितली जाईल. दिव्यांग पाठ्यवृत्ती धारकांनी सादर केलेली कागदपत्रे, विश्वविद्यालय / संस्थेच्या अधीक्षण अधिकाऱ्याच्या पडताळणीनंतर, अंतिम मंजुरीसाठी विभागाकडे पाठवण्यात येईल.<br>४. पाठ्यवृत्ती प्रदान करण्याबाबतीचे, विभागाचे निर्णय अंतिम असतील आणि अशा निर्णयाबद्दल कोणतीही याचिका विचारात घेतली जाणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | ५. परिणाम विभागाच्या संकेत स्थळावर प्रकाशित केले जातील आणि निवड झालेल्या उमेदवारांना प्रदान पत्रे दिली जातील.<br>**लाभार्थी:** या योजनेचा उद्देश, दिव्यांग व्यक्तींना, आर्थिक सहाय्यतेचा स्वरूपात, पाठ्यवृत्ती प्रदान करणे असा आहे. ज्यायोगे, त्यांना, विश्वविद्यालय अनुदान आयोगाकडून मान्यताप्राप्त भारतीय विश्वविद्यालये / संस्था / महाविद्यालयात, विज्ञान, मानवविज्ञान किंवा सामाजिक शास्त्र इ. विषयांमध्ये विद्यावाचस्पती, तत्वज्ञानात पदव्युत्तर पदवी (एम.फिल) अशा उच्च अभ्यासक्रमात शिक्षण घेता येईल.<br>**फायदे:**वर नमूद केल्याप्रमाणे<br>**अर्ज कसा करावा:** वर नमूद केल्याप्रमाणे |
| **७.** | **दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय परदेशी शिष्यवृत्ती** | **अर्थ सहाय्य :** केंद्र शासन<br>**पात्रता निकष**<br>**सर्वसाधारण पात्रता निकष –**<br>१. शिष्यवृत्ती फक्त भारतीय नागरिकांसाठी उपलब्ध आहेत.<br>२. शिष्यवृत्तीचे सर्व घटक अशा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असतील, जे योजनेचे प्रमुख निकष जसे की, 40% किंवा जास्त अपंगत्व (अपंग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 अनुसार), पूर्ण करत असतील आणि ज्यांच्याकडे, सक्षम प्राधिकार्याने, नियमानुसार, निर्गमित केलेले ग्राह्य अपंगत्व प्रमाणपत्र असेल.<br>३. समान पालकांच्या दोन पेक्षा जास्ती दिव्यांग मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. दुसरे मूल जर जुळे असेल तर ही शिष्यवृत्ती योजना त्या जुळया मुलाला/मुलीला लागू होईल.<br>४. ही शिष्यवृत्ती कुठल्याही एका इयत्तेत शिक्षण घेण्यासाठी एकाच वर्षासाठी दिली जाईल. एखादा विद्यार्थी एकाच इयत्तेत परत शिकणार असेल तर अशा दुसऱ्या किंवा |

| | | |
|---|---|---|
| | | नंतरच्या वर्षासाठी, त्याला/तिला, शिष्यवृत्ती मिळणार नाही.<br>५. या योजनेमधील शिष्यवृत्तीधारक आणखी कुठल्याही शिष्यवृत्ती / विद्यावेतनाचा लाभ घेऊ शकणार नाही. अशा विद्यार्थ्यांना, दुसरी शिष्यवृत्ती/विद्यावेतन स्वीकारण्याच्या दिवसापासून, या योजनेखालील कुठलीही शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.<br>६. (अर्जकर्त्याकडे) शिष्यवृत्तीच्या लाभासाठी, दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्र / दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्रासाठी नावनोंदणी आवश्यक आहे.<br>**योजनेसाठी विशिष्ट पात्रता निकष —**<br>१. ही शिष्यवृत्ती अशा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असतील, जे योजनेचे प्रमुख निकष जसे की, 40% किंवा जास्त अपंगत्व (अपंग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 अनुसार), पूर्ण करत असतील आणि ज्यांच्याकडे, सक्षम प्राधिकार्याने, नियमानुसार, निर्गमित केलेले ग्राह्य अपंगत्व प्रमाणपत्र असेल.<br>२. विद्यावाचस्पती पदवीकरिता — संबंधित पदव्युत्तर पदवी परीक्षेमध्ये पंचावन्न टक्के (55%) गुण किंवा सममूल्य गुणवत्ता.<br>३. पदव्युत्तर पदवीकरिता : — संबंधित स्नातक पदवी परीक्षेमध्ये पंचावन्न टक्के (55%) गुण किंवा सममूल्य गुणवत्ता.<br>४. जर सत्र गुणवत्ता अंक किंवा सरासरी गुणवत्ता अंक निर्देशांक इ. जर सममूल्य असतील, तर संस्था/महाविद्यालय/विश्वविद्यालय यांच्याकडून रितसर प्रमाणित रूपांतर गुणक मान्य केले जाईल.<br>५. असे उमेदवार, जे, कुठल्याही एखाद्या केंद्र/राज्य शासनाच्या मंत्रालय/विभागाकडून उपलब्ध असणाऱ्या शिष्यवृत्तीचा उपयोग करून / इतर माध्यमातून / स्वतःच्या खर्चाने, परदेशी संस्था / महाविद्यालय / विश्वविद्यालयात |

आधीपासून पदव्युत्तर पदवी किंवा विद्यावाचस्पती पदवी अभ्यासक्रमात शिकत आहेत अथवा ज्यांनी पदव्युत्तर/ विद्यावाचस्पती पदवी मिळवली आहे, या योजनसाठी अर्ज करण्यास अपात्र असतील. याशिवाय, राष्ट्रीय परदेशी शिष्यवृत्ती, एक व्यक्तीला त्याच्या/तिच्या आयुष्यात एकदाच मिळू शकते.

६. जे उमेदवार, समान पातळीवरील (पदव्युत्तर/ विद्यावाचस्पती पदवी) परंतु वेगळ्या शाखेच्या (विज्ञान/वाणिज्य/कला) अभ्यासक्रमात शिकू इच्छितात, ते सुद्धा या योजनेखालील शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरतील. त्याकरिता, त्यांनी एखाद्या, भारतीय अथवा परदेशी विश्वविद्यालय / संस्था / महाविद्यालयाची पात्रता संपादन केलेली असली पाहिजे. उमेदवाराने, त्या समान पातळीवरील अभ्यासक्रमासाठी, केंद्र/राज्य शासनातर्फे दिली जाणारी शिष्यवृत्तीचा अवलंब केलेला नसावा.

७. (अर्जदाराचे वय) अर्ज केल्याच्या वर्षाच्या 1 जानेवारीला 35 (पस्तीस) वर्षाखाली असावे.

८. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 8 लाखांपेक्षा अधिक नसावे.

**दिले जाणारे लाभ**

**आर्थिक सहाय्याचे प्रमाण खालीलप्रमाणे असेल —**

| अनु क्र | लाभांचे प्रकार आणि तपशील | दर | उद्देश |
|---|---|---|---|
| १ | शिक्षणशुल्क | प्रत्यक्ष रक्कम | |
| | | देखभाल भत्ता | |
| २ | अमेरिका आणि इतर देश | अमेरिकन डॉलर 15,400 प्रति वर्षी | (अ) आणि (ब) देशांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना, भोजन आणि आवासाकरीता होणाऱ्या संकीर्ण खर्चासाठी देखभाल भत्ता दिला जाईल |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३ | इंग्लंड साठी | ब्रिटिश पौंड 9900 प्रति वर्षी | (अ) आणि (ब) देशांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना, भोजन आणि आवासाकरीता होणाऱ्या संकीर्ण खर्चासाठी देखभाल भत्ता दिला जाईल. |
| | | | | आकस्मितता भत्ता | |
| | | ४ | अमेरिका आणि इतर देश | अमेरिकन डॉलर 1500 प्रति वर्षी | पुस्तके, उपयुक्त उपकरणे, अभ्यासदौरा, अभ्यासक्रमासंबंधीत परिषदा/कार्यशाळांना उपस्थित राहण्यासाठी होणारा खर्च इ./प्रबंधाचे टंकलेखन आणि पुस्तकबांधणी इ. साठी उपलब्ध. |
| | | ५ | इंग्लंड साठी | ब्रिटिश पौंड 1100 प्रति वर्षी | पुस्तके, उपयुक्त उपकरणे, अभ्यासदौरा, अभ्यासक्रमासंबंधीत परिषदा/कार्यशाळांना उपस्थित राहण्यासाठी होणारा खर्च इ./प्रबंधाचे टंकलेखन आणि पुस्तकबांधणी इ. साठी उपलब्ध. |
| | | ६ | आकस्मिक प्रवास भत्ता | $ 20/- (अमेरिकन डॉलर वीस फक्त) किंवा भारतीय रुपयामध्ये त्याच्या समतुल्य – फक्त एकदा | |
| | | ७ | उपकरण भत्ता | $ 20/- (अमेरिकन डॉलर वीस फक्त) – फक्त एकदा | |
| | | ८ | डोईपट्टी (पोल टॅक्स) | प्रत्यक्ष रक्कम दिली जाईल, जिथे लागू असेल तिथे | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ९ | प्रवासासाठी आवश्यक वैद्यकीय चाचण्यांसाठी होणारा खर्च. यजमान देशाच्या आवशक्यतेनुसार | देयक सदर केल्यावर प्रत्यक्ष रक्कम दिली जाईल. | |
| | | १० | बँक व्यवहार शुल्क | रूपांतर शुल्क + सेवा शुल्क + स्त्रोतवरील कर (टीसीएस)+ रूपांतर अडत, देयक सदर केल्यावर प्रत्यक्ष रक्कम दिली जाईल. | |
| | | ११ | प्रवेश परवाना शुल्क (व्हिसा शुल्क) | प्रवेश परवाना शुल्काची प्रत्यक्ष रक्कम भारतीय रुपयात दिली जाईल. | |
| | | १२ | वैद्यकीय विम्याचा हप्ता | प्रत्यक्ष रक्कम | |
| | | १३ | विमान प्रवास खर्च | a) शिष्यवृत्ती धारकांना विमानाचे तिकीट (भारतातील राहत्या गावाच्या सगळयात जवळच्या विमानतळापासून ते शैक्षणिक संस्थेच्या सर्वात जवळच्या गावापर्यंत आणि भारतात परत येण्यासाठी) खरेदी करण्याची परवानगी असेल. हे तिकीट तीन अधिकृत प्रवास सहायकांकडूनच म्हणजे बामर लॉरी कंपनी लि., अशोक ट्रॅवल्स & टुर्स, भारतीय रेल खानपान आणि पर्यटन महामंडळ (आयआरसीटीसी) खरेदी केलेले असले पाहिजे. हे तिकीट आरक्षण करण्याच्या दिवशी इकॉनॉमी वर्गाचे आणि सगळयात जवळच्या मार्गाचे असायला हवे. b) प्रवास सहायका ची | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | निवड पूर्णपणे शिष्यवृत्ती धारका वर सोडण्यात आली आहे. आरक्षण शुल्क, अतिरिक्त सामानाचे शुल्क, रद्द करण्याचे शुल्क, इतर वरकड गोष्टी इ. ची परिपूर्ती होणार नाही. c) शिष्यवृत्तीधारक, विश्वविद्यालयात दाखल झाल्यानंतर, विश्वविद्यालायकडून रुजू झाल्याचे प्रतिवेदन संबंधित परदेशी भारतीय दूतावासाकडे सादर करून विमानभाडे परत मागू शकतात. सुधारित अटी 1 एप्रिल 2022 पासून लागू होतील. d) परतीचे तिकीट परदेशी भारतीय दूतावासातर्फे आरक्षित केले जाईल | |
| | | १४ | इंग्रजी भाषा किंवा इतर चाचण्यांना उपस्थित राहण्यासाठी लागणारे परीक्षा शुल्क | परदेशातील संस्था/ विश्वविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी ज्या इंग्रजी भाषा किंवा इतर चाचण्या (जीआरई, जीएमएटी, टीओईएफएल, आयईएलटीएस इ.), आवश्यक आहेत, त्यांना उपस्थित राहण्यासाठी एकदाच द्यायचे परीक्षा शुल्क, भारतीय दूतावासा द्वारे परिपूर्त केले जाईल. ह्या परिपूर्तीची कमाल मर्यादा रु.50,000/- आहे. | |
| | | १५ | स्थानिक प्रवास | उतरलेल्या गावापासून शिक्षण संस्थेपर्यंत आणि परतीच्या प्रवासाचे द्वितीय श्रेणीचे रेल भाडे. जर अशी जागा दूर असेल आणि रेल्वेने जोडलेली नसेल, तर राहण्याच्या जागेपासून सर्वात | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जवळच्या रेल्वे स्थानकपर्यंतचे बस भाडे, होडीनी ओलांडायचे प्रत्यक्ष भाडे, सर्वात जवळच्या रेल्वे-सह-विमानतळापर्यंत विमान भाडे आणि/किंवा उतरण्याच्या गावापासून आणि परत, सर्वात जवळच्या रस्त्याचे द्वितीय श्रेणी रेल भाडे, भारतीय दूतावासाकडून परिपूर्त केले जातील. | |
| १६ | संशोधन / शिक्षक सहायकाचे काम करून मिळवलेले उत्पन्न | शिष्यवृत्तीधारकांना, त्यांना मिळणाऱ्या भत्याना पूरक म्हणून संशोधन / शिक्षक सहायकाचे काम करण्यास परवानगी आहे. याची कमाल मर्यादा अमेरिकन $ 2400/- (अमेरिकन डॉलर दोन हजार चारशे फक्त) प्रति वर्षी आणि इंग्लंडमधील शिष्यवृत्तीधारकांसाठी 1560/- पौंड (एक हजार पाचशे साठ पौंड) प्रति वर्षी, अशी आहे. (जर हे उत्पन्न) स्वीकार्य कमाल मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर योजनेमधील वार्षिक देखभाल भत्ता त्या अनुषंगाने कमी केला जाईल. | |

**योजनेचा प्रकार** - पाठ्यवृत्ती

**योजने अंतर्गत अर्ज करण्याची प्रक्रिया**

१. उमेदवारांनी, योजनेच्या अटींप्रमाणे, आपली पात्रता आणि योग्यता पारखून, दिव्यांगजन सशक्तिकरण विभागाकडे अर्ज करावा. दुरदृष्यप्रणालीद्वारे (ऑनलाइन) अर्ज करण्याची पद्धत विकसित करून कार्यरत झाल्यानंतर, त्याद्वारेच अर्ज मागवण्यात येतील. उमेदवाराने, योग्य

| | | |
|---|---|---|
| | | प्रकारे भरलेला अर्ज (विभागाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध) आवश्यक कागदपत्रांसहित विभागाकडे सादर करावा. नोकरदार उमेदवारांनी, आपल्या नियोक्त्याकडून "ना हरकत प्रमाणपत्र" (एनओसी) घेऊन, या विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.<br>२. योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, सर्व अर्ज, पडताळणी समितीद्वारे तपासले जातील. पडताळणी समितीद्वारे अल्पसूचित केले गेलेले पात्र उमेदवार, निवड समितीकडे पाठवले जातील. निवड समिति, पात्र उमेदवारांचे, शैक्षणिक पात्रता आणि अनुभव, त्यांच्या अपंगत्वाचा प्रकार आणि टक्केवारी, ते प्रवेश घेत असलेला परदेशातील अभ्यासक्रम आणि विश्वविद्यालय इ. निकषांवर मूल्यांकन करून, वार्षिक मंजूर जागांएवढी, एक गुणवत्ता सूची तयार करेल. यानंतरच, निवड प्रक्रिया, पूर्णपणे पार पडली असे म्हणता येईल.<br>३. कोणत्याही टप्प्यावर संस्था/महाविद्यालय/विश्वविद्यालय बदलण्याची विनंती विचारात घेतली जाणार नाही. जर शिष्यवृत्ती धारक, अभ्यासक्रम अथवा विश्वविद्यालयात बदल इच्छित असेल, तो/ती नव्याने अर्ज करु शकतात.<br>४. शिष्यवृत्तीधारकास, शिष्यवृत्ती निश्चितीचे पत्र दिल्यानंतर, त्याने/तिने, मूळ कागदपत्रांची पडताळणी, बंधपत्र सादर करणे, पतदारी प्रमाणपत्र इ. प्रक्रिया, पुढील 6 महिन्यात पूर्ण करायला हव्यात. असे न केल्यास, शिष्यवृत्ती निश्चितीचे पत्र आपोआप रद्द होईल. या प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आणखी वेळ दिला जाणार नाही.<br>**लाभार्थी:**प्रमाणरूप अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांना, परदेशी, खालील विशिष्ठ अभ्यास क्षेत्रांमध्ये, पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रम आणि विद्यावाचस्पती पदवी अभ्यासक्रमासाठी आर्थिक सहाय्य करणे: अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन शुद्ध विज्ञान आणि उपयोजित विज्ञान कृषी विज्ञान आणि वैद्यकशास्त्र वाणिज्य, पुस्तपालन (अकाउंटिंग) |

<table>
<tr><td></td><td></td><td>आणि वित्त आणि मानवता, कायदा आणि ललित कलांसह सामाजिक विज्ञान.<br>फायदे: वर नमूद केल्याप्रमाणे<br>अर्ज कसा करावा : वर नमूद केल्याप्रमाणे</td></tr>
<tr><td>८.</td><td>प्रमाणरूप अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उच्च श्रेणी शिक्षण शिष्यवृत्ती</td><td>अर्थ सहाय्य : केंद्र शासन<br>पात्रता निकष: सर्वसाधारण पात्रता निकष —<br>१. शिष्यवृत्ती फक्त भारतीय नागरिकांसाठी उपलब्ध आहेत.<br>२. शिष्यवृत्तीचे सर्व घटक अशा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असतील, जे योजनेचे प्रमुख निकष जसे की, 40% किंवा जास्त अपंगत्व (अपंग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 अनुसार), पूर्ण करत असतील आणि ज्यांच्याकडे, सक्षम प्राधिकार्याने, नियमानुसार, निर्गमित केलेले ग्राह्य अपंगत्व प्रमाणपत्र असेल.<br>३. समान पालकांच्या दोन पेक्षा जास्ती दिव्यांग मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. दुसरे मूल जर जुळे असेल तर ही शिष्यवृत्ती योजना त्या जुळया मुलाला/मुलीला लागू होईल.<br>४. ही शिष्यवृत्ती कुठल्याही एका इयत्तेत शिक्षण घेण्यासाठी एकाच वर्षासाठी दिली जाईल. एखादा विद्यार्थी एकाच इयत्तेत परत शिकणार असेल तर अशा दुसऱ्या किंवा नंतरच्या वर्षासाठी, त्याला/तिला, शिष्यवृत्ती मिळणार नाही.<br>५. या योजनेमधील शिष्यवृत्तीधारक आणखी कुठल्याही शिष्यवृत्ती / विद्यावेतनाचा लाभ घेऊ शकणार नाही. अशा विद्यार्थ्यांना, दुसरी शिष्यवृत्ती/विद्यावेतन स्वीकारण्याच्या दिवसापासून, या योजनेखालील कुठलीही शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.<br>६. (अर्जकर्त्याकडे) शिष्यवृत्तीच्या लाभासाठी, दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्र / दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्रासाठी नावनोंदणी आवश्यक आहे.</td></tr>
</table>

**योजनेसाठी विशिष्ट पात्रता निकष –**

१. (या शिष्यवृत्तीसाठी) दिव्यांगजन सशक्तिकरण विभागातर्फे अधिसूचित, शिक्षणक्षेत्रातील उत्कृष्ठ संस्थांमधील स्नातक आणि पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रम ग्राह्य धरले जातील.

२. या योजनेअंतर्गत, कुठल्याही शाखेचे दूरस्थ शिक्षण / अर्ध-वेळ / सप्ताहान्त शिक्षण, शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणार नाही. याशिवाय, एका व्यक्तीस एकदाच ही सुविधा मिळत असल्यामुळे, या घटकांतर्गत दिला जाणारा लाभ, दुसऱ्या अथवा नंतरच्या लाभासाठी विचारात घेतला जाणार नाही

३. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 8 लाखांपेक्षा अधिक नसावे.

**दिले जाणारे लाभ :** प्रमाणरूप अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या उच्च श्रेणी शिक्षण शिष्यवृत्तीच्या प्रमाणामध्ये खालील घटकांचा समावेश आहे:-

| अनु क्र | शिष्यवृत्तीचे घटक / तपशील | योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | संस्थेला दिलेले / देय शिक्षणशुल्क आणि विना परतावा शुल्काची प्रतिपूर्ती | प्रति वर्षी रु. दोन लाखापर्यंत (वास्तविक रकमेवर अवलंबून) |
| २ | देखभाल भत्ता | रु. 3,000/- दर महा वसतिगृहस्थ विद्यार्थ्यांसाठी, रु. 1,500/- दर महा अनिवासी विद्यार्थ्यांसाठी |
| ३ | विशेष भत्ता (अपंगत्वाच्या प्रकारांशी संबंधित, जसे की पाठक भत्ता, अनुरक्षक, मदतनीस भत्ता इ.) | रु. 2,000/- दर महा |
| ४ | पुस्तके आणि लेखनसामग्री | रु. 5,000/- प्रति वर्षी |
| ५ | संगणक / मांडी संगणक आणि त्यांना लागणारी उपसाधने खरेदी करण्यास | अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षामध्ये एकदाच मिळणारे अनुदान म्हणून रु. 45,000/-. (या घटकाचा लाभ घेण्यासाठी, विद्यार्थ्याला, आवश्यक कागदपत्रे दाखल करावी लागतील |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><td></td><td>लागणाऱ्या खर्चाची परिपूर्ती</td><td>उदा. संगणक / मांडी संगणक खरेदी केल्याचा पुरावा म्हणून देयक / पावती)</td></tr>
<tr><td>६</td><td>निवडलेल्या उमेदवारांच्या, विशिष्ठ अपंगत्वाशी संबंधित, साधने आणि सहायक उपकरणे खरेदी करण्यासाठी केलेल्या खर्चाची परिपूर्ती.</td><td>अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षामध्ये एकदाच मिळणारे अनुदान म्हणून रु. 30,000/-. (रकमेची परिपूर्ती मिळण्यासाठी, विद्यार्थ्याला, आवश्यक कागदपत्रे दाखल करून, दाव्याची सत्यता सुनिश्चित करावी लागेल, जसे की, खरेदी देयक / पावती.</td></tr>
</table>
योजनेचा प्रकार : शिष्यवृत्ती<br>
योजने अंतर्गत अर्ज करण्याची प्रक्रिया : ह्या बद्दल जास्त माहिती त्यांच्या संकेतस्थळावर मिळू शकेल.<br>
लाभार्थी: (या शिष्यवृत्तीसाठी) दिव्यांगजन सशक्तिकरण विभागातर्फे अधिसूचित, शिक्षणक्षेत्रातील उत्कृष्ठ संस्थांमधील स्नातक आणि पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रम ग्राह्य धरले जातील.<br>
फायदे:वर नमूद केल्याप्रमाणे<br>
अर्ज कसा करावा: वर नमूद केल्याप्रमाणे
</td>
</tr>
<tr>
<td>९.</td>
<td>दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शालांत परीक्षेनंतर मिळणारी (मॅट्रिकोत्तर) शिष्यवृत्ती</td>
<td>
अर्थ सहाय्य : केंद्र शासन<br>
पात्रता निकष - सर्वसाधारण पात्रता निकष –<br>
१. शिष्यवृत्ती फक्त भारतीय नागरिकांसाठी उपलब्ध आहेत.<br>
२. शिष्यवृत्तीचे सर्व घटक अशा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असतील, जे योजनेचे प्रमुख निकष जसे की, 40% किंवा जास्त अपंगत्व (अपंग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 अनुसार), पूर्ण करत असतील आणि ज्यांच्याकडे, सक्षम प्राधिकार्याने, नियमानुसार, निर्गमित केलेले ग्राह्य अपंगत्व प्रमाणपत्र असेल<br>
३. समान पालकांच्या दोन पेक्षा जास्ती दिव्यांग मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. दुसरे मूल जर जुळे असेल तर ही शिष्यवृत्ती योजना त्या जुळ्या मुलाला/मुलीला लागू होईल.
</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | ४. ही शिष्यवृत्ती कुठल्याही एका इयत्तेत शिक्षण घेण्यासाठी एकाच वर्षासाठी दिली जाईल. एखादा विद्यार्थी एकाच इयत्तेत परत शिकणार असेल तर अशा दुसऱ्या किंवा नंतरच्या वर्षासाठी, त्याला/तिला, शिष्यवृत्ती मिळणार नाही.<br>५. या योजनेमधील शिष्यवृत्तीधारक आणखी कुठल्याही शिष्यवृत्ती / विद्यावेतनाचा लाभ घेऊ शकणार नाही. अशा विद्यार्थ्यांना, दुसरी शिष्यवृत्ती/विद्यावेतन स्वीकारण्याच्या दिवसापासून, या योजनेखालील कुठलीही शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.<br>६. (अर्जकर्त्याकडे ) शिष्यवृत्तीच्या लाभासाठी,दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्र / दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्रासाठी नावनोंदणी आवश्यक आहे.<br>**योजनेसाठी विशिष्ट पात्रता निकष —**<br>१. शालांत परीक्षेनंतर मिळणारी (मॅट्रिकोत्तर) शिष्यवृत्ती, सर्व मान्यताप्राप्त शालांत किंवा माध्यमिक परीक्षेनंतरच्या (पदव्युत्तर पदवी पर्यन्त), मान्यताप्राप्त संस्थांच्या अथवा विश्वविद्यालयांच्या अभ्यासक्रमात, शिक्षण घेण्यासाठी दिल्या जातील. त्यांना अपवाद खालीलप्रमाणे :<br>२. असे उमेदवार, जे एका अभ्यासक्रमाचा एक टप्पा उत्तीर्ण होऊन, दुसऱ्या विषयाचा तोच टप्पा शिकत आहेत उदा.एका विषयात कला स्नातक (पदवी घेऊन), वाणिज्य स्नातक पदवी अभ्यासक्रम शिकणारे विद्यार्थी पात्र ठरणार नाहीत. तथापि, असे विद्यार्थी, जे कला स्नातक / विज्ञान स्नातक / अभियांत्रिकी स्नातक पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन, विधी स्नातक / शिक्षण पदवी (बी एड) / प्राथमिक शिक्षण पदवी (बी.एल.एड) असे अभ्यासक्रम शिकू इच्छितात, ते या योजने अंतर्गत शालांत परीक्षेनंतर मिळणारी (मॅट्रिकोत्तर) शिष्यवृत्तीस पात्र असतील.<br>३. जे विद्यार्थी एकाचवेळी दोन वेगळ्या अभ्यासक्रमात शिकत असतील, त्यांना कुठल्यातरी एकाच |

| | | |
|---|---|---|
| | | अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मिळेल. असे अभ्यासक्रम संबंधित शैक्षणिक प्राधिकरणाच्या नियम आणि अटींमध्ये अनुज्ञेय असायला हवेत.<br>४. जे विद्यार्थी, कला, विज्ञान, वाणिज्य पूर्व-पदवी परीक्षा, उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण होऊन, एखाद्या मान्यताप्राप्त व्यावसायिक अथवा तांत्रिक प्रमाणपत्र/पदविका/पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेतील, जर ते अन्यथा पात्र असतील, तर त्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल.<br>५. जे विद्यार्थी, आपला अभ्यासक्रम पत्रव्यवहाराद्वारे चालू ठेवत असतील, या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरतील. पत्रव्यवहार या संज्ञेमध्ये दूरस्थ आणि प्रौढ शिक्षणाचा समावेश आहे.<br>६. आ) नोकरीदार विद्यार्थी, ज्यांचे उत्पन्न, त्यांच्या पालक / पालनकरत्याच्या उत्पन्नासहीत एकत्रित केले असता, विहित मर्यादेच्या आत असेल, अशा विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेनंतर मिळणारी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती दिली जाऊ शकेल. ही शिष्यवृत्ती, अनिवार्यपणे देय आणि विना परतावा शिक्षणशुल्काच्या मर्यादेपर्यंतच परिपूर्त केली जाईल.<br>७. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 2.5 लाखांपेक्षा अधिक नसावे.<br>**दिले जाणारे लाभ :** शालांत परीक्षेनंतर मिळणारी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीमध्ये, अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीसाठी खालील लाभांचा समावेश आहे:<br>१. परिपोषण भत्ता<br>२. पुस्तकांसाठी अनुदान<br>३. दिव्यांगत्व भत्ता<br>४. अनिवार्यपणे देय आणि विना परतावा शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती |

| अनु क्र | तपशील | अनिवासी विद्यार्थी | वसतिगृहस्थ विद्यार्थी |
| --- | --- | --- | --- |
| १ | **देखभाल भत्ता (दर महा)** | | |
| i | **गट I** सर्व वैद्यकीय / अभियांत्रिकी / तंत्रज्ञान, नियोजन /वास्तुशास्त्र / फॅशन तंत्रज्ञान / व्यवस्थापन / उद्योगधंदा / वित्त प्रशासन / संगणक विज्ञान आणि अनुप्रयोग / कृषी / पशुवैद्यकीय आणि संबंधित विज्ञान ह्या विषयातले स्नातक / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम. कुठल्याही ज्ञानशाखेतील, (यूजीसी) विद्यापीठ अनुदान आयोग किंवा (एआयसीटीई) अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेकडून मान्यताप्राप्त, सर्व पदव्युत्तर पदवी आणि पदविका अभ्यासक्रम. | 750 | 1600 |
| ii | **गट II** औषधनिर्माणशास्त्र (बी.फार्मा), विधी स्नातक, न्यायसहायक विज्ञान स्नातक (फॉरेन्सिक सायन्स बॅचलर), पुनर्वसन, रोगनिदानकौशल्य इ. इतर निमवैद्यकीय सेवा,जनसंसूचन, हॉटेल व्यवस्थापन व खानपान, प्रवास/पर्यटन/आतिथ्य, गृहशोभन, पोषण आणि आहारशास्त्र, व्यावसायिककला, वित्तीय सेवा (बँकेचे व्यवहार / विमा / कर आकारणी) अशासारख्या क्षेत्रामधील व्यावसायिक पदवी / पदविका / प्रमाणपत्र अभ्यासक्रम | 700 | 1100 |
| iii | **गट III**गट I आणि II मध्ये समाविष्ट नसलेले सर्व इतर स्नातक पदवी अभ्यासक्रम उदा. बीए / बीएससी / बीकॉम ई. | 650 | 950 |
| iv | **गट iv**शालांत परीक्षेनंतरच्या मॅट्रिकोत्तर स्तरावरील सर्व पदवी न देणारे अभ्यासक्रम, ज्यांच्यासाठी प्रवेश पात्रता माध्यमिक शाळा (इयत्ता दहावी), ठरवण्यात आली आहे. उदा. उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता अकरावी आणि बारावी), सामान्य आणि व्यावसायिक शाखा, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे अभ्यासक्रम, तंत्रविद्यानिकेतनाचा 3 वर्षांचा पदविका अभ्यासक्रम इ. | 550 | 900 |
| २ | **अपंगत्व भत्ता (प्रति वर्षी)** | | |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><td>i</td><td>दृष्टिदोष किंवा बौद्धिक अपंगत्व</td><td>4000</td><td></td></tr>
<tr><td>ii</td><td>उर्वरित सर्व अपंगत्वाचे प्रकार</td><td>2000</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>अनिवार्यपणे देय आणि विना परतावा शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती – प्रति वर्षी शिक्षण शुल्क भत्ता (कमाल मर्यादा )</td><td>शिक्षण शुल्क भत्ता: रु. 1,50,000/- प्रति वर्षी</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td>पुस्तकांसाठी अनुदान (प्रति वर्षी)</td><td>पुस्तकांसाठी अनुदान: रु. 1,500 /- प्रति वर्षी</td><td></td></tr>
</table>
योजनेचा प्रकार : शिष्यवृत्ती<br>
योजने अंतर्गत अर्ज करण्याची प्रक्रिया :<br>
ह्या बद्दल जास्त माहिती त्यांच्या संकेतस्थळावर मिळू शकेल.<br>
लाभार्थी: अकरावी, बारावी, शालांत परीक्षेनंतर मिळणारी (मॅट्रिकोत्तर) पदविका / प्रमाणपत्र अभ्यासक्रम, भारतातील स्नातक पदवी किंवा पदविका, विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) किंवा अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेकडून (एआयसीटीई) मान्यताप्राप्त विश्वविद्यालयाची पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रमात शिकणारे दिव्यांग विद्यार्थी.<br>
फायदे: वर नमूद केल्याप्रमाणे<br>
अर्ज कसा करावा: वर नमूद केल्याप्रमाणे
</td>
</tr>
<tr>
<td>१०.</td>
<td>दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शालांत परीक्षा-पूर्व शिष्यवृत्ती</td>
<td>
अर्थ सहाय्य : केंद्र शासन<br>
पात्रता निकष: सर्वसाधारण पात्रता निकष –<br>
१. शिष्यवृत्ती फक्त भारतीय नागरिकांसाठी उपलब्ध आहेत.<br>
२. शिष्यवृत्तीचे सर्व घटक अशा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असतील, जे योजनेचे प्रमुख निकष जसे की, 40% किंवा जास्त अपंगत्व (अपंग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 अनुसार), पूर्ण करत असतील आणि ज्यांच्याकडे, सक्षम प्राधिकार्याने, नियमानुसार, निर्गमित केलेले ग्राह्य अपंगत्व प्रमाणपत्र असेल.
</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | ३. समान पालकांच्या दोन पेक्षा जास्ती दिव्यांग मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. दुसरे मूल जर जुळे असेल तर ही शिष्यवृत्ती योजना त्या जुळ्या मुलाला/मुलीला लागू होईल.<br>४. ही शिष्यवृत्ती कुठल्याही एका इयत्तेत शिक्षण घेण्यासाठी एकाच वर्षासाठी दिली जाईल. एखादा विद्यार्थी एकाच इयत्तेत परत शिकणार असेल तर अशा दुसऱ्या किंवा नंतरच्या वर्षासाठी, त्याला/तिला, शिष्यवृत्ती मिळणार नाही.<br>५. या योजनेमधील शिष्यवृत्तीधारक आणखी कुठल्याही शिष्यवृत्ती / विद्यावेतनाचा लाभ घेऊ शकणार नाही. अशा विद्यार्थ्यांना, दुसरी शिष्यवृत्ती/विद्यावेतन स्वीकारण्याच्या दिवसापासून, या योजनेखालील कुठलीही शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.<br>६. (अर्जकर्त्याकडे ) शिष्यवृत्तीच्या लाभासाठी,दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्र / दिव्यांग व्यक्तींसाठी विशिष्ठ ओळखपत्रासाठी नावनोंदणी आवश्यक आहे.<br>**योजनेसाठी विशिष्ट पात्रता निकष –**<br>१. उमेदवार, शासकीय शाळा किंवा शासन-मान्यता प्राप्त किंवा केंद्र/राज्य माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मान्यताप्राप्त शाळेत, नववी किंवा दहावीत शिकणारा, एक नियमित, पूर्ण वेळ देणारा विद्यार्थी असावा.<br>२. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 2.5 लाखांपेक्षा अधिक नसावे.<br>**दिले जाणारे लाभ** :शालांत परीक्षापूर्व शिष्यवृत्तीमध्ये, अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीसाठी खालील लाभांचा समावेश आहे:<br>१. देखभाल भत्ता<br>२. पुस्तकांसाठी अनुदान<br>३. अपंगत्व भत्ता |

| अनु क्र | तपशील | अनिवासी विद्यार्थी | वसतिगृहस्थ विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | देखभाल भत्ता (दर महा) | 500 | 800 |
| २ | पुस्तकांसाठी अनुदान (प्रति वर्षी) | 1000 | 1000 |
| | अपंगत्व भत्ता (प्रति वर्षी) | | |
| ३ | दृष्टिदोष किंवा बौद्धिक अपंगत्व | 4000 | 4000 |
| ४ | उर्वरित सर्व अपंगत्वाचे प्रकार | 2000 | 2000 |

**योजनेचा प्रकार :** शिष्यवृत्ती

**योजने अंतर्गत अर्ज करण्याची प्रक्रिया :** ह्या बद्दल जास्त माहिती त्यांच्या संकेतस्थळावर मिळू शकेल.

**लाभार्थी:**इयत्ता नववी आणि दहावीत शिकणारे दिव्यांग विद्यार्थी

**फायदे:** वर नमूद केल्याप्रमाणे

**अर्ज कसा करावा:** वर नमूद केल्याप्रमाणे

********

## Information of District Offices, implementing schemes meant for Disabled Persons

| Sr. No. | District | Designation | Detailed Office Address | Office Phone No. | Office Email ID |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Ahilyanagar | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Ahilyanagar. | Opp Maliwada Bus stand, Ahilyanagar | 02412356286 | swozpanagar@yahoo.in, dswozpahmednagar@gmail.com |
| 2. | Akola | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Akola. | Zilla Parishad compound, Akola | 07242 -425779 | dswozp.akl@gmail.com |
| 3. | Amrawati | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Amrawati. | Zilla Parishad compound, Amrawati-444603 | - | swozpamt@gmail.com |
| 4. | Beed | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Beed. | Dr.Babasaheb Ambedkar Samajik Nyayy Bhavan, Nagar road, Dist. Beed | - | dswo.zpbid@gmail.com |
| 5. | Bhandara | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Bhandara | Zilla Parishad, Bhandara -441904 | 07184252367 | swozpb@gmail.com |
| 6. | Buldhana | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Buldhana. | Jaysthambha chowk, Chikhali road, Buldhana-443001 | - | samajkalyanzpbul@gmail.com |
| 7. | Chandrapur | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Chandrapur. | Jatpura Raod, Chandrapur.- 442401 | 07172-25593 | dswozpchandrapur@gmail.com |
| 8. | Chhatrapati Sanbhajinagar | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Chhatrapati Sanbhajinagar. | Samajik Nyayy Bhavan, Khokadpura, near Shivaji Highschool, Chhatrapati Sanbhajinagar | - | dswozpaurangabad1@gmail.com |
| 9. | Dharashiv | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Dharashiv. | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Dharashiv | 02472-227649 | swozposmanabad2011@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 10. | Dhule | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Dhule. | Opp. SBI main branch, Near collector office, Dhule | 02562-229470 | dswozpdhule@gmail.com |
| 11. | Gadchiroli | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Gadchiroli. | Social Welfare Office, Zilla Parishad, Gadchiroli | 07132-297459 | swogadchiroli@gmail.com |
| 12. | Gondiya | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Gondiya. | Patanga Maidan, Fulchar, Dist. Gondiya | 07182-233291 | swozpgondia@rediffmail.com, swozpgondia@gmail.com |
| 13. | Hingoli | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Hingoli. | Hingoli Nanded road, Zilla Parishad office, Main Building, Ground Floor, Hingoli | 02456-222477 | swozphingoli@gmail.com |
| 14. | Jalgaon | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Jalgaon. | Old Zilla Parishad Bhavan, Tower Chowk, Near Shivaji Nagar Flyover, Jalgaon - 425001 | 0257-2240161 | swozpjalgaon@gmail.com |
| 15. | Jalna | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Jalna. | Opp.District Session Court, Near Ambad chaufuli,Jalna-431203 | | zpjalnaswo@gmail.com, swozpjalna@gmail.com |
| 16. | Kolhapur | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Kolhapur. | Nagala Park, in front of Collector Office, Ground Floor, Dist. Kolhapur-416003 | 0231-2950162 | swozpkop@gmail.com |
| 17. | Latur | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Latur. | Behind Old Collector Office, Shivaji Chowk, First Floor, Latur Pin 413512 | 02382-255092 | dswozplatur1@gmail.com |
| 18. | Mumbai City | Assistant Commissioner, Social Welfare, Mumbai City. | Adminstrative Building, Part-1, 4$^{th}$ Floor, R.C Chemburkar Marg, Chembur Mumbai-400071 | 022-25275073 | mumbaicityspldswo@yahoo.com |
| 19. | Mumbai Sub-urban | Assistant Commissioner, | Adminstrative Building, Part-1, 4$^{th}$ Floor, R.C | 022-25222023 | *acswomumbaisub@gmail.com;* spldswo_mumsub@yahoo.co.in |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Social Welfare, Mumbai Sub-urban. | Chemburkar Marg, Chembur Mumbai-400071 | | |
| 20. | Nagpur | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Nagpur. | Oposite ravi bhavan GPO Squqre New zilla parishad building Civil lines Nagpur | 07122564324 | dswozpnagpur@gmail.com |
| 21. | Nanded | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Nanded. | Near City Post Office, Nanded-431601 | 02462245100 | dswozpnanded1@gmail.com, **swo_zpnnd@yahoo.com;** |
| 22. | Nandurbar | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Nandurbar. | Tokar Talav Road, Nandurbar | 02564-210238 | *swozpnandurbar@gmail.com* |
| 23. | Nashik | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Nashik. | Zilla Parishad Bhavan, Trimbak Naka, GPO road, Nashik-422001 | 0253-2502251 | dswozpnashik@gmail.com, dswozpnashik@rediffmail.com |
| 24. | Palghar | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Palghar. | Room No. 003, Ground Floor, Kolgaon-Boisar Road, Collector Compound, Palghar. | 02525- 205407 | dswozppalghar@gmail.com, swdzppalghar@gmail.com |
| 25. | Parbhani | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Parbhani. | Zilla Parishad, Main Building, Ground Floor, Mahatma Phule chowk, Near Stedium 431401 | - | dswozpparbhani@gmail.com |
| 26. | Pune | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Pune. | Yashwantrao Chavan Zilla Parishad Bhavan, Dr. Babasaheb Ambedkar Road, Camp, Pune 411001. | - | dswozppune@gmail.com, ***apang.zppune@gmail.com*** |
| 27. | Raigad | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Raigad. | District Social Welfare Officer, Zilla Parishad Raigad, KunteBaug, Alibaug Tq Alibaug Dist Raigad 402201 | - | dswozpraigad@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 28. | Ratnagiri | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Ratnagiri. | Bharataratna Dr. Babasaheb Ambedkar Bhavan, Malnaka, Tal & Dist – Ratnagiri. Pin - 415612 | 02352- 350705 | dswozpratnagiri@gmail.com |
| 29. | Sangli | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Sangli. | Zilla parishad Sangli Miraj road sangli Dist – Sangli Pin - 416416 | 02332372714 | dswozpsangli@gmail.com |
| 30. | Satara | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Satara. | Zilla Parishad main Building, Ground floor, Koregaon Road, Satara, District Satara- 415001 | 02162-228764 | dswozpsatara@gmail.com |
| 31. | Sindhudurg | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Sindhudurg. | Room No 12, Zill Parishad, Administrative Building, Ground Floor, Sindhudurg, Sindhudurg Nagri, Oros, Tal. Kudal, Dist. Sindhudurg | 02362-228741 | swozpsindhu@gmail.com |
| 32. | Solapur | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Solapur. | Zilla Parishad Compound, Solapur | 0217-2722557 | zpsolapurswo@gmail.com |
| 33. | Thane | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Thane. | Squarefeet Home, Opp. GST Bhavan Wagle Estate No.22, Thane-400 604 | 022-25448677 | swdzpthane@gmail.com |
| 34. | Wardha | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Wardha. | Zilla Parishad Civil lines Taluka Dist.Wardha - 442001 | 07152 242783 | dswozpwardha@gmail.com |
| 35. | Washim | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Washim. | Opp. District Collector's Office, Washim | 07252-232877 | dswozpwashim@gmail.com |
| 36. | Yavatmal | District Social Welfare Officer, Zilla Parishad, Yavatmal. | Ground Floor, Zilla Parishad Building, Arni Road, Yavatmal. | 0723 - 229546 | dswozpyavatmal@gmail.com |

दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची जिल्हा कार्यालयांची माहिती

| **अ.क्र.** | जिल्हा | पदनाम | **कार्यालयाचा संपुर्ण पत्ता** | **कार्यालयाचा दुरध्वनी.** | **कार्यालयाचा ईमेल आयडी** |
|---|---|---|---|---|---|
| १. | अहिल्यानगर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, अहिल्यानगर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, अहिल्यानगर माळीवाडा बस स्टॅंड समोर, अहिल्यानगर | ०२४१-२३५६२८६ | swozpanagar@yahoo.in, dswozpahmednagar@gmail.com |
| २. | अकोला | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, अकोला. | जिल्हा परिषद कंपाऊड अकोला | ०७२४२ -४२५७७९ | dswozp.akl@gmail.com |
| ३. | अमरावती | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, अमरावती | जिल्हा समाज कल्याण विभाग जि.प कॅम्प अमरावती - ४४४६०३ | - | swozpamt@gmail.com |
| ४. | बीड | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, बीड. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड जि. बीड | - | dswo.zpbid@gmail.com |
| ५. | भंडारा | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, भंडारा | जिल्हा परिषद भंडारा-४४१९०४ | ०७१८४२५२३६७ | swozpb@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६. | बुलढाणा | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, बुलढाणा. | जयस्तंभ चौक, चिखली रोड बुलढाणा - ४४३००१ | - | samajkalyanzpbul@gmail.com |
| ७. | चंद्रपुर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, चंद्रपुर | चंद्रपूर ,जटपुरा रोड, चंद्रपूर पिन - ४४२४०१ | ०७१७२-२५५९३३ | dswozpchandrapur@gmail.com |
| ८. | छत्रपती संभाजीनगर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, छत्रपती संभाजीनगर | सामाजिक न्याय भवन खोकडपुरा, शिवाजी हायस्कुलच्या बाजुला, छत्रपती संभाजीनगर | - | dswozpaurangabad१@gmail.com |
| ९. | धाराशिव | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, धाराशिव. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, धाराशिव. | ०२४७२-२२७६४९ | swozposmanabad२०११@gmail.com |
| १०. | धुळे | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, धुळे. | जिल्हा परिषद धुळे, भारतीय स्टेट बॅक मुख्य शाखेसमोर, जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी, धुळे | ०२५६२-२२९४७० | dswozpdhule@gmail.com |
| ११. | गडचिरोली | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, गडचिरोली | समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद गडचिरोली | ०७१३२-२९७४५९ | swogadchiroli@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२. | गोंदीया | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, गोंदीया. | पतंगा मैदान फुलचर जिल्हा गोंदिया | ०७१८२-२३३२९१ | swozpgondia@rediffmail.com, swozpgondia@gmail.com |
| १३. | हिंगोली | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, हिंगोली | हिंगोली नांदेड रोड जिल्हा परिषद कार्यालय मेन बिल्डींग तळमजला जि.हिंगोली | ०२४५६-२२२४७७ | swozphingoli@gmail.com |
| १४. | जळगांव | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, जळगांव. | जुने जिल्हा परिषद भवन, टॉवर चौक, शिवाजीनगर फलॉयओव्हर जवळ जळगाव- ४२५००१ | ०२५७-२२४०१६१ | swozpjalgaon@gmail.com, |
| १५. | जालना | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, जालना | जिल्हा सत्र न्यायालयासमोर अंबड चौफुली जवळ, ता.जि.जालना - ४३१२०३ | - | swozpjalna@gmail.com |
| १६. | कोल्हापूर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, कोल्हापूर. | नागाळा पार्क, जिल्हाधिकारी कार्यालया समोर, तळमजला जि.कोल्हापूर -४१६००३ | ०२३१-२९५०१६२ | swozpkop@gmail.com |
| १७. | लातूर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, लातूर. | जुन्या-कलेक्टर ऑफिस च्या मागे, पहिला मजला शिवाजी चौक लातूर - ४१३५१२ | ०२३८२-२५५०९२ | dswozplatur1@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८. | मुंबई शहर | सहाय्यक आयुक्त. समाज कल्याण मुंबई शहर | प्रशासकीय इमारत भाग-१, चौथा मजला आरसी चेंबुरकरमार्ग, चेंबुर मुंबई - ४०००७१ | ०२२-२५२७५०७३ | mumbaicityspldswo@yahoo.com |
| १९. | मुंबई उपनगर | सहाय्यक आयुक्त. समाज कल्याण मुंबई उपनगर | प्रशासकीय इमारत भाग-१, चौथा मजला आरसी चेंबुरकरमार्ग, चेंबुर मुंबई - ४०००७१ | ०२२-२५२२२०२३ | *acswomumbaisub@gmail.com;* spldswo__mumsub@yahoo.co.in |
| २०. | नागपूर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, नागपूर. | रविभवन समोर, जीपीओ चौक, नविन जिल्हा परिषद इमारत, सिव्हील लाईन, नागपूर | ०७१२-२५६४३२४ | dswozpnagpur@gmail.com |
| २१. | नांदेड | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, नांदेड. | समाज कल्याण अधिकारी जि.प नांदेड मुख्यपोस्ट ऑफीस जवळ नांदेड - ४३१६०१ | ०२४६२२४५१०० | dswozpnanded१@gmail.com |
| २२. | नंदुरबार | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, नंदुरबार. | जिल्हा परिषद नंदुरबार, टोकर तलाव रोड, नंदुरबार ता.जि.नंदुरबार | ०२५६४-२१०२३८ | *swozpnandurbar@gmail.com* |
| २३. | नाशिक | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, नाशिक. | जिल्हा परिषद भवन त्र्यंबक नाका, जीपीओ रोड, नाशिक - ४२२००१ | ०२५३-२५०२२५१ | dswozpnashik@gmail.com, dswozpnashik@rediffmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २४. | पालघर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, पालघर | रूम नंबर ००३ तळमजला, कोळगाव-बोईसर रोड कलेक्टर कंपाउंड, जि पालघर | ०२५२५- २०५४०७ | dswozppalghar@gmail.com, swdzppalghar@gmail.com |
| २५. | परभणी | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, परभणी. | जिल्हा परिषद मुख्य इमारत, तळमजला महात्मा फुले चौक स्टेडियमजवळ परभणी - ४३१४०१ | - | dswozpparbhani@gmail.com |
| २६. | पुणे | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, पुणे. | यशवंतराव चव्हाण जिल्हा परिषद भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड कॅम्प पुणे ४११०० | - | dswozppune@gmail.com, *apang.zppune@gmail.com* |
| २७. | रायगड | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, रायगड. | जिल्हा समाजकल्याण अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग कुंटेबाग, ता.अलिबाग, जि.रायगड<br>पिनकोड ४०२ २०१ | - | dswozpraigad@gmail.com |
| २८. | रत्नागिरी | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, रत्नागिरी. | भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन मालनाका ता.जि. रत्नागिरी - ४१५६१२ | ०२३५२- ३५०७०५ | dswozpratnagiri@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९. | सांगली | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, सांगली. | जिल्हा परिषद सांगली, मिरज रोड सांगली जि.सांगली- ४१६४१६ | ०२३३२३७२७१४ | dswozpsangli@gmail.com |
| ३०. | सातारा | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, सातारा. | जिल्हा परिषद मुख्य इमारत तळमजला सातारा, कोरेगांव रोड जि.सातारा -४१५००१ | ०२१६२-२२८७६४ | dswozpsatara@gmail.com |
| ३१. | सिंधुदुर्ग | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, सिंधुदुर्ग | दालन क्र. १२, जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत, तळमजला, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, सिंधुदुर्ग नगरी, ओरोस, ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग- ४१६८१२ | ०२३६२-२२८७४१ | swozpsindhu@gmail.com |
| ३२. | सोलापूर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, सोलापूर. | जिल्हा परिषद आवार सोलापूर | ०२१७-२७२२५५७ | *zpsolapurswo@gmail.com* |
| ३३. | ठाणे | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, ठाणे | स्क्वेअर फीट होम, जीएसटी भवन समोर, वागळे इस्टेट, नंबर २२, जि.ठाणे- ४००६०४ | ०२२-२५४४८६७७ | *swdzpthane@gmail.com* |
| ३४. | वर्धा | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, वर्धा. | जिल्हा परिषद, सिव्हील लाइन्स, ता.जि.वर्धा - ४४२००१ | ०७१५२ -२४२७८३ | dswozpwardha@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३५. | वाशिम | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, वाशिम. | जिल्हाधिकारी कार्यालया समोर, वाशिम | ०७२५२-२३२८७७ | dswozpwashim@gmail.com |
| ३६. | यवतमाळ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, यवतमाळ | तळमजला, जिल्हा परिषद बिल्डींय, अर्णी रोड यवतमाळ | ०७२३ - २२९५४६ | dswozpyavatmal@gmail.com |